मंगळवार, १२ सप्टेंबर २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - ४३

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 12 SEPTEMBER 2023

adhunikkesari.com Adhunik Kesari

YEAR-03 • ISSUE-43 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5


## ओबीसी आरक्षणाला धक्का लावाल तर रस्त्यावर उतरू : समन्वय समितीचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मूळ ओबीसीच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे, ओबीसीच्या कोट्यातून आरक्षण दिल्यास समग्र ओबीसी समाज रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. सरकारला याचा गंभीर परिणाम भोगावा लागेल असा इशारा भोकर ओबीसी समन्वय समितीच्या वतीने सोमवारी (ता. ११) निवेदनाव्दारे देण्यात आला आहे.

तहसील कार्यालयास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्रात सकल मराठा समाज बांधवांनी आरक्षणासाठी लढा उभारला असून अनेक ठिकाणी धरणे, आंदोलने व उपोषण सुरू आहेत. त्यांची मागणी ही रास्त आहे. तेव्हा या सरकारने त्यांना कायद्याच्या चौकटीतून आरक्षण जरूर द्यावे परंतु मूळ ओबीसीच्या कोट्यातून आरक्षण देण्यात येऊ नये. तसेच बिहार राज्याच्या धर्तीवर ओबीसी समाजाची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करावी, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारावे अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्या मान्य न झाल्यास समग्र ओबीसी समाज रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन छडेल असा इशारा देण्यात आला आहे.



ओबीसी समन्वय समितीचे सदस्य नामदेवराव आयलवाड, माधवराव अमृतवाड, ॲड.शेखर कुंठे, मोहनराव राठोड, बालाजीराव शानमवाड,उज्वल केसराळे, गणेशराव राठोड,राजू अंगरवाड, सुरेशराव बिल्लेवाड, नागोराव शेंडगे, नागनाथ गौड पाटील ज्ञानेश्वर गोदेवाड, सुदाम आडे, बि.आर. पांचाळ, बालाजी नार्लेवाड, सुभाष नाईक,रमेश महागावकर, गजानन गाडे, पांडुरंग वर्षेवार, अड. परमेश्वर पांचाळ, सत्यम रेड्डी किनीकर, राजेश्वर रेड्डी लोकावड, गजानन गाढे, नागोराव दंडे, भुमारेड्डी किनीकर, गंगाधर महादावाड, माधवराव कस्नुरे, पुंडलिक तोटावाड, संतोष आनेराये, दिगंबर लालवंडे, साईनाथ फेटेवाड, दिगंबर पप्पूलवाड, जगणराव बुट्टनवाड, दिलीप बाच्चेवाड, रमेशराव राठोड आदीसह ओबीसी समन्वय समितीच्या अनेक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


# चीनचे दोन मंत्री गायब

## परराष्ट्र मंत्र्यानंतर आता संरक्षणमंत्रीही बेपत्ता

आधुनिक केसरी न्यूज

**बीजिंग : चीनचे परराष्ट्र किन गँग हे गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असल्याची चर्चा सुरू असतानाच सोशल मीडियावर दावा गेला जात आहे की, परराष्ट्र मंत्र्यानंतर आता संरक्षणमंत्री ली शांगफूही बेपत्ता झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून ली शांगफू हे कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात दिसलेले नाहीत. त्यामुळे या चर्चांना बळ मिळत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भारताशेजारील चीनमध्ये सर्व काही आलबेल नसून राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासमोरील अडचणी वाढण्याची शक्यता आहे.**

या आधी चीनचे परराष्ट्र मंत्री बेपत्ता झाल्याच्या चर्चा होत्या. त्यानंतर चीनी सैन्याच्या शक्तीशाली रॉकेट फोर्सचा जनरल बेपत्ता झाला होता. आता थेट संरक्षणमंत्री बेपत्ता झाल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यामुळे चीनमध्ये काहीतरी गंभीर घडत असल्याचे चित्र आहे. जपानमधील अमेरिकेचे राजदूत रहम इमॅन्युएल यांनी दावा केला आहे की, चीनचे संरक्षण मंत्री गेल्या दोन आठवड्यांपासून सार्वजनिक ठिकाणी दिसले नाहीत. X म्हणजे ट्विटर या सोशल मीडिया वेबसाइटवर त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. शी जिनपिंग यांनी संरक्षण मंत्र्यांसमोर सुरक्षा आणि स्थैर्याबाबत मुद्दे उपस्थित केले होते, असे याआधी चिनी वृत्तसंस्थेने म्हटले होते. हाँगकाँगमधील इंग्रजी दैनिक 'साउथ चायना मॉर्निंग पोस्ट' मध्ये आलेल्या वृत्तानुसार, चीनचे संरक्षणमंत्री शेवटचे 29 ऑगस्ट 2023 रोजी बीजिंगमध्ये झालेल्या चीन-आफ्रिका पीस अँड सिक्युरिटी फोरमच्या बैठकीत सहभागी झाले होते. तेव्हापासून चीनचे संरक्षण मंत्री सार्वजनिक ठिकाणी दिसले नाहीत. याआधी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी जुलैमध्ये परराष्ट्रमंत्री किन गँग यांना अचानक हटवले होते. त्यानंतर त्यांच्या जागी वांग यी यांना परराष्ट्रमंत्री बनवल्याची बातमी समोर आली. चीनचे माजी परराष्ट्रमंत्री किन गँग यांना पदावरून हटवल्यापासून ते गायब असल्याची चर्चा सुरू आहे.



मार्च 2023 मध्ये ली शांगफू यांची वेई फेंगे यांच्या जागी चीनचे नवीन संरक्षण मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये कम्युनिस्ट पार्टी काँग्रेसमध्ये केंद्रीय लष्करी आयोगाचा राजीनामा दिला होता. विशेष म्हणजे पूर्वीच्या चिनी संरक्षण मंत्र्यांप्रमाणे ली हे लष्करी कुटुंबातून आलेले आहेत. लींचे दिवंगत वडील ली शाओझू हे रेड आर्मीचे दिग्गज होते. जे 1930 आणि 1940 च्या उत्तरार्धात जपानविरोधी युद्धात लढले. चीनमधील गृहयुद्ध आणि त्यानंतरच्या कोरियन युद्धादरम्यान लॉजिस्टिक रेल्वेच्या पुनर्बांधणीतील त्याच्या भूमिकेसाठीही ते ओळखले जात होते.

आता चीनमध्ये सुरू असलेल्या या राजकीय अस्थिरतेवर विविध प्रकारचे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. स्वतःशी जिनपिंग आपल्या नेत्यांना हटवत आहेत की यामागे आणखी काही षडयंत्र आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. बीजिंगमध्ये तरी काय चालले आहे? याबाबत सध्या कोणालाच काही माहिती नाही.

### महत्त्वाची बातमी

## 15 ऑगस्टला येणार अल्लू अर्जुनचा पुष्पा-2

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अभिनेता अल्लू अर्जुनच्या पुष्पा-2 म्हणजेच 'पुष्पाः द रूल' या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. अल्लू अर्जुनने त्याच्या पुष्पा-2 या चित्रपटामधील लूकचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला होता. त्याच्या या लूकने अनेकांचे लक्ष वेधले होते. आता 'पुष्पाः द रूल' या चित्रपटाच्या रिलीज डेटची घोषणा करण्यात आली आहे. अल्लू अर्जुनने ट्विटरवर एक खास फोटो शेअर करुन 'पुष्पाः द रूल' या चित्रपटाच्या रिलीज डेटची घोषणा केली आहे. अल्लू अर्जुननं ट्विटरवर एक खास फोटो शेअर केला आहे. ज्यामध्ये अल्लू अर्जुनचा हात दिसत आहे. या हातात गोल्डन कलरच्या स्टोनच्या अंगठ्या आणि ब्रेसलेट्स घातलेले दिसत आहेत. फोटोमागे अल्लू अर्जुनचा चेहरा दिसत आहे. अल्लू अर्जुननं या फोटोला कॅप्शन दिलं, 'AUGUST 15TH 2024!!!' पुढच्या वर्षी स्वातंत्र्य दिनाला 'पुष्पाः द रूल' हा चित्रपट रिलीज होणार आहे. स्ताद सुकुमार दिग्दर्शित आणि मायथ्री मूव्ही मेकर्स निर्मित पुष्पा 2 या चित्रपटात अल्लू अर्जुन, रश्मिका मंदान्ना आणि फहद फासिल हे कलाकार काम करणार आहेत. 'पुष्पाः द राइज' या चित्रपटासाठी अल्लू अर्जुनला यावर्षाचा सर्वोत्कृष्ट अभिनेता हा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. आता त्याच्या पुष्पा-2 या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

'पुष्पाः द रूल' या चित्रपटाचं शूटिंग रामोजी फिल्म सिटीमध्ये झाले आहे.

# अखेर हदगाव शहरातील 'तो' रस्ता झाला दुरुस्त

## 'अधुनिक केसरी'च्या बातमीची दखल

आधुनिक केसरी न्यूज

सिद्धार्थ वाठोरे

हदगाव : शहरातील हनुमान मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले होते. याचा नाहक त्रास नागरीकांना सहन करावा लागत होता. "हदगाव शहरातील रस्त्याला आले तलावाचे स्वरूप" या मथळ्याखाली "दैनिक अधुनिक केसरी"मध्ये बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीची दखल घेत पालिकेने त्वरित रस्त्याची दुरुस्ती करून घेतली. यामुळे स्थानिक रहिवासी समाधान व्यक्त करत आहेत.

शहरातील मुख्य रस्त्यावर पाणी साचल्यामुळे रस्ता खराब झालेला असून वाहणारे सांडपाणी साचल्यामुळे रस्त्यावरून ये जा करणाऱ्या वाहनधारकांना व पायी चालणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

शहरातील मुख्य बाजारपेठमध्ये जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून रस्त्यावर सांडपाणी साचून ते रस्त्यावर येत आहे. याच रस्त्यावर हनुमान मंदिर आहे.



आधुनिक केसरी

26 Aug 2023


हदगावातील रस्त्याला आले तलावाचे स्वरूप

आधुनिक केसरी न्यूज

सिद्धार्थ वाठोरे




येणाऱ्या भाविकांना हनुमानच्या मंदिरात रोजच दर्शनासाठी पायी येताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रोडवरील पाण्याचा निचरा होण्यासाठी कुठलीही पायाभूत व्यवस्था केली नसल्याने रोडवरील डांबरीकरण उखडून रस्त्यांवर खड्डेच खड्डे पडले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या सततच्या पावसामुळे या खड्ड्यांचे मोठे डबके निर्माण झाले आहे. या डबक्यांतून वाहन पुढे नेण्यासाठी वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रोडवर सर्वत्र पडलेल्या खड्डयात पाणी साचल्यामुळे वाहनधारकांना खड्डयांचा अंदाज येत नाही. त्यामुळे या खड्डयांत वाहने आदळत असून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, म्हणून या रस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी नागरिक करत होते. दरम्यान, २६ ऑगस्ट रोजी "हदगाव शहरातील मुख्य रस्त्यावर आले तलावाचे स्वरूप या मथळयाखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीतून सदर रस्त्याची बिकट अवस्था आणि पादचाऱ्यांची व्यथा मांडण्यात आली होती. या बातमीची दखल घेत पालिका प्रशासनाने तत्काळ डागडुजी केली आहे. त्यामुळे रहिवाशांनी आभार व्यक्त केले आहेत.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# स्वयंपूर्ण ग्रामीण भारत



आधुनिक केसरी

अरे बापरे ! एवढी प्राचीन परंपरा आहे ही ! आश्चर्यच आहे ! ' श्यामराव म्हणाले. 'श्यामराव, हे तर काहीच नाही. खरं आश्चर्य पुढेच आहे. ते मार्कंडयाचें वंशज एवढे कुशल कारागीर होते की पूर्वी ते ही साडी देवतांसाठी विणायचे असे म्हटले जाते. आणि अगदी आताच्या या साड्यांबद्दल बोलायचं झालं तरी ही परंपरा चारशे वर्षांपेक्षाही अधिक जुनी आहे. त्याचे पुरावे सम्राट कृष्णदेवरायाच्या काळापासून आढळतात. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक आदी ठिकाणचे कारागीर सुद्धा या साड्या तयार करत. या साड्या हातमागावर तयार केल्या जातात. साडी आणि काठ वेगळे विणले जातात. नंतर ते एकत्र जोडतात. या साडीसाठी शुद्ध अति तलम अशा रेशमाचा वापर केला जातो. त्यावर वेगवेगळ्या डिझाइन्स असतात. साडीचा रंग आणि तिचे काठ यांचा रंग कॉन्ट्रास्ट म्हणजे वेगळा किंवा विरुद्ध ठेवतात. त्यामुळे तिचे सौंदर्य खुलून दिसते. तिच्यासाठी सोने आणि चांदीच्या जरीचा वापर केला जातो. एक साडी बनवण्यवासाठी कधी कधी काही महिनेही लागू शकतात. ' भगवानराव म्हणाले. पिंकी म्हणाली, ' काका, इतक्या प्राचीन काळापासून भारतातील लोकांना ही कला अवगत होती ? ' ' हो तर. प्राचीन भारतातील लोकांना वस्त्रनिर्मितेचे तंत्र उत्तम प्रकारे अवगत होते. पूर्वीच्या भारतात ढाक्यात तयार होणारी मलमल प्रसिद्ध होती. त्याचप्रमाणे सुरत, माळवा, खंडवा येथील मलमल सुद्धा अतिशय प्रसिद्ध होती. भारताचा परदेशांशी व्यापार चालत होता. भारतीय कापड इतक्या उच्च प्रतीचे होते की आपण मागू त्या किमतीला इतर देशातील व्यापारी ते विकत घ्यायला तयार असत. त्या बदल्यात अगदी सोने मागितले तरी ते दिले जाई. म्हणजेच आपल्याकडील कापडाला सोन्याचा भाव होता आणि सोने ही त्याकाळी विनिमयाची वस्तू होती. म्हणून तर आपला देश अतिशय समृद्ध होता. इंग्रंजांसाठी तो ' सोने की चिडिया ' ठरला. ' भगवानराव सांगत होते. प्राचीन भारतीय संस्कृती हा त्यांच्या आवडीचा विषय होताच. श्यामराव म्हणाले, ' अरे भगवान, तू जे हे सांगतोस त्याला काहीतरी आधार नक्कीच असेल, नाही का ? अरे जे इंग्रज, स्कॉटिश, डच, पोर्तुगीज इतिहासकार भारतात त्या काळी येऊन गेले, त्यांनी प्राचीन भारताचे वर्णन केले आहे. त्यांनी लिहून ठेवले आहे. त्यातूनच ही माहिती आपल्याला कळते. पण दुर्दैवाने आपल्या मुलांना भारतीय संस्कृतीचा हा समृद्ध इतिहास शिकवलाच जात नाही .'



# आनंदी पहाट

## तथ्य असणारे पथ्य नेहमीच पाळावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आजच्या धकधकीच्या जीवनात आपलं मानसिक, शारीरिक स्वास्थ्य हरवत चाललं आहे. मुख्य म्हणजे आपली दिनचर्या योगसाधनेच्या विपरीत झाली आहे. ह्यासाठी आय. टी कंपन्यांचं उदाहरण घेतलं तर लगेच लक्षात येईल. आपल्या देशातील इंजिनिअर, डिझायनर आणि कॉल सेंटरवरील प्रत्येकाला भारतीय वेळेप्रमाणे दिनचर्या न ठेवता परदेशातील वेळेप्रमाणे काम करत असतात. दिवसाच्या सुरवातीपासूनच भारतातील सेवा मिळवण्यासाठी परदेशांतून फोन येतात. ब्रह्ममुहूर्त ही साधनेची उत्तम वेळ आहे, परंतु रात्री उशिरांपर्यंत काम करून झोपायला ज्यांना तीन ते चार वाजतात, त्यांची तर ती मध्यरात्रीची वेळ असते. अशा प्रकारे परदेशातील दिनचर्येशी आपली दिनचर्या जुळत नसल्याने त्याचा थेट परिणाम शारीरिक ्वास्थ्यावर होत राहतो. मुलभूत गरजांपैकी वस्त्र आणि निवारा ह्या दोन्ही गरजा महत्वाच्या असतातच पण त्याहीपेक्षा अधिक महत्वाची गरज म्हणजे अन्न होय. त्या अन्नाशिवाय कोणताही जीव जगूच शकत नाही. त्याची गरज शारीरिक स्वास्थ्यासाठी अधिक असते, आपल्या जगण्यासाठी असते. काही वर्षांपूर्वी घरं शेणानं सारवली जायची. अलीकडच्या काळांत टाईल्सचा सर्वात अधिक वापर केला जात आहे. त्यामुळे सांधेदुखीचे आजार आपण पाठीमागे लावून घेत आहोत. पूर्वी घरांची रचना देखील पर्यावरणपूरक असायची. बदलत्या हवामानाचा कोणताही विपरीत परिणाम त्यामुळे आपल्या शरीरावर अथवा मनावर होत नव्हता. जेवण झाल्यानंतर किमान एक तास तरी झोपू नये. आहारासोबत विहार महत्त्वाचा असल्याने व्यायामाला देखील तेवढेच महत्त्व आहे. म्हणून किमान ४० मिनिटे चालणे, योगासने, सायकलिंग तसेच डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे व्यायाम करणे गरजेचं असतं. परंतू प्रत्यक्षात किती जणांकडून त्यातील तथ्य लक्षांत घेऊन ती पथ्य पाळली जातात.



आधुनिक केसरी

## संजीवन झाला | योगीराज ||

सकळांचा भाव | सोयरा जीवाचा ||
तोचि वैष्णवांचा | आत्माराम ||१||
आत्ममग्न होता | मौनाच्या दिंडीत ||
देहाच्या कुडीत | भेटे विठु ||२||
विकारी बुडाला | संसारी हा जीव ||
परमार्थी ठाव | त्यासी कैसा ? ||३||
सर्व भुता ठायी | आत्मरूप पाही ||
जाण ती ज्ञानाई | युगंधर ||४||
अद्वैताचा मेळा | ज्ञाने उजळीला ||
संजीवन झाला | योगीराज ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी

श्रीपार्वति नमस्तुभ्यं पर्वतराजकन्यके | धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् || ८७ || हे पर्वतराजकन्यके, हे श्रीपार्वती, तुला नमस्कार असो. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

वेद विहित सब ज्ञान का, कारण है मधुज्ञान । मधुविद्या परकाश में, सभी प्रकाशित जान ।।१४।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय) ०४/०१/१४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सर्व वैदिक ज्ञानांचे कारण-आधार ब्रम्हविद्या आहे. ब्रम्हविद्येच्या प्रकाशातच सर्व ज्ञान-विज्ञान प्रगट होते. समस्त ज्ञान-विज्ञानाचा आत्मा ब्रम्हविद्या आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# सिध्दलक्षण

आधुनिक केसरी






सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सर्व प्रथम परमात्म्याच्या विषयी वृत्ती स्थिर असली पाहिजे. देहाचे व्यापाराला जास्त महत्व न देता, अन्न,वस्त्र, निवारा ह्या देहाच्या अवस्था तर सतत चाललेल्या असतात. पण जो सदासर्वकाळ आत्मस्वरूपाशी मनाने चिकटून राहतो,त्याला प्रपंचाची काळजी नसते. साधनेतून सिध्दावस्था प्राप्त होते. म्हणजेच जो बाहेरून दिसायला साधक दिसतो पण त्याचा अंन्तरात्मा मात्र आत्मस्वरूपाशी एकरूप झालेला असतो त्याला सिध्द म्हणावे. ज्याचे मन सतत समाधानी असते जो कशाचाही हव्यास करत नाही तो सिध्द होय.सिध्दावस्थे पर्यन्त जाण्यासाठी साधक हा आत्मस्वस्वरूपात विलीन होऊन जो स्वस्वरूप झाला. व वृत्ती भगवंताच्या पायाशी एकरूप झाली तर तो सिध्द होय.

# भगवंत जोडणे हाच एक धर्म

आधुनिक केसरी

भगवंत जोडत असेल तर अधर्मही करावा; भगवंत जोडणे हाच एक धर्म. अभिमानाने कोणतेही कृत्य केले तर ते नाही भगवंताला पोहोचत. दानधर्म केला, धर्मशाळा बांधल्या, हे सर्व नाव होण्याकरिता जर केले, तर त्याचा तुमच्या कल्याणाला काय उपयोग झाला ? भगवंत जवळ न येता त्यामुळे अभिमान मात्र वाढतो. बाभळीची झाडे लावली तर त्यांना आंबे कसे येतील ? मीपणाने केलेले काम नाही उपयोगी पडत. शरणबुद्धीने केलेले काम हाच खरा धर्म. मी भगवंताच्या हातचे बाहुले आहे असे समजावे. 'राम कर्ता' असे म्हणावे. म्हणजे, देवाजवळ शरणबुद्धी धरावी. भगवंताची निष्ठा कोणत्याही वयात आणि कोणत्याही अवस्थेत वाढवता येते. ही निष्ठा कधी कुणाला हार जाणार नाही, किंवा कधी कुणापुढे मान लवविणार नाही. एकदा भगवंतावर पूर्ण निष्ठा ठेवल्यावर मग काळजीचे कारणच काय ? काळजीने कार्याचा नाश होतो आणि कर्तव्याचा विसर पडतो. भगवंतावर श्रद्धा ठेवून प्रयत्न करावा, आणि जे फळ मिळेल त्यात समाधान मानावे. व्यवहारात सौख्य कर्तव्याने मिळते, तसे परमार्थात सौख्य निष्ठेने मिळते. परमार्थ करणाऱ्या माणसाने कोणाचेही अंतःकरण दुखवू नये. परमार्थ हा लबाड आणि भोंदू माणसाचा नाही, तसा तो बावळ्या माणसाचाही नाही. व्यवहारात कुणाला फसवू नये, आणि कशाला भुलू नये. आपले डावपेच किंवा लबाडी लोकांना फसविण्यासाठी नसावी. लोकांकडून न फसण्याइतकेच आपण व्यवहारी असावे. आपल्या हातामध्ये जितका पैसा असेल, त्या मानानेच देवघेव करावी. व्यवहाराच्या दृष्टीने देणे न राहील असे वागावे. 'कोणत्याही परिस्थितीत मी राहीन' असे जो म्हणेल त्याला कधीच अडचण पडत नाही. आपण श्रीमंतांचा द्वेष करू नये आणि गरीबांना कमी लेखू नये. अशी वृत्ती बनायला भगवंताची निष्ठा पाहिजे. प्रत्येकाला खायला प्यायला भरपूर मिळाले पाहिजे ही संपत्तीची समान वाटणी होय. मोबदला न देता आपण पैसा घेतला, तर, तो ज्याचा घेतला त्याची वासना त्याला चिकटून बरोबर येते. काय गंमत आहे बघा, इतर बाबतीत मनुष्य वचन पाळण्याची पराकाष्ठा करतो, पण तो पैशाचे वचन देतो ते सहज, आणि ते मोडतोही सहज. तेवढेच वचन पाळण्यात तो कुचराई करतो. पैसा नसून अडते आणि तो असून नडते, अशी आपली परिस्थिती आहे. संन्याशाने एक दिवसाचा संग्रह करावा, गृहस्थाने तीन दिवसांचा संग्रह करावा. आपल्याजवळ तीन दिवस खायला आहे असे पाहिल्यावर आपण मुळीच काळजी करू नये.



# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

लौकिक कार्या मध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपण ही त्यात नाहीसे व्हावे. "जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी, "अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी. थोडक्यात म्हणजे, आपल्याला मुळात काय पाहिजे हेच कळत नाही. कावीळ झाली म्हणजे डोळयाला खरे रूप कसे कळणार ? म्हणून, ज्याचे डोळे साफ आहेत तो सांगेल त्या प्रमाणे वागावे. या करिता गुरू-आज्ञा प्रमाण मानून आपण वागत जावे. नाम श्रद्धेने आणि शुद्ध भावाने घ्यावे म्हणजे मनात शंका येत नाहीत. सदगुरूच्या आज्ञेचे पालन करताकरता साधकाला नामाची गोडी लागते, आणि नाम पोटभर घेतल्याने त्याचा आत्मा तृप्त होतो. आणी मानसिक शांती खऱ्या अर्थाने लाभते. आणखी एक महत्वाचे म्हणजे ग्रंथ हे गुरु होत. तेव्हा तुमच्या दृष्टीने सर्व श्रेष्ठ ग्रंथ कोणता ?

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

बोलाविती देवा ।तुका गडियांचा मेळावा ॥३॥
गडी गेले रडी ।कान्हो नेदीस तूं चढी ॥१॥
आम्ही न खेळों न खेळों ।आला भाव तुझा कळों ॥ध्रु.॥
न साहावे भार ।बहु लागतो उशीर ॥२॥
तुका आला रागें ।येऊं नेदी मागें मागें ॥३॥
यमुनेतटीं मांडिला खेळ ।म्हणे गोपाळ गडियांसि ॥१॥
हाल महाहाल मांडा ।वाउगी सांडा मोकळी ॥ध्रु.॥
नांवें ठेवूनि वांटा गडी ।न वजे रडी मग कोणी ॥२॥
तुका म्हणे कान्हो तिळतांदळ्या ।जिंके तो करी आपुला
खेळ्या ॥३॥बळें डाईं न पडे हरी ।बुद्धि करी शाहणा तो ॥१॥
मोकळें देवा खेळों द्यावें ।सम भावें सांपडावया ॥ध्रु.॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १२ सप्टेंबर २०२३



मधुमेहामुळे कोणते दुष्परिणाम उद्भवतात ?

पान ६



क्या 'इंडिया' जितेगा देश का भरोसा ?

पान ७

# ‘एबीपी माझा’कडून वसंत मुंडे यांचा सन्मान

## ‘महाराष्ट्राचे अनमोल रत्न’ पुरस्काराने पत्रकारितेतील योगदानाबद्दल गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील प्रतिष्ठित ‘एबीपी माझा’ या वृत्तवाहिनीने वृत्तपत्र आणि डिजीटल माध्यमातील नाविण्यपूर्ण भरीव योगदानाची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा ‘महाराष्ट्राचे अनमोल रत्न’ हा पुरस्कार देवून गौरव केला. प्रसारमाध्यम क्षेत्रातून या पुरस्कारासाठी निवडलेले वसंत मुंडे हे एकमेव पत्रकार. यापूर्वीही लोकमत मीडिया ग्रुपच्यावतीने त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मानीत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील आघाडीची वृत्तवाहिनी एबीपी माझाने यावर्षी उद्योगासह विविध क्षेत्रात नाविण्यपूर्ण काम करणाऱ्या लोकांना ‘महाराष्ट्राचे अनमोल रत्न’ हा पुरस्कार देवून सन्मानीत केले. मुंबईतील कोर्टयार्ड मेरिट या पंचतारांकित हॉटेलमध्ये शुक्रवार, दि.8 सप्टेंबर 2023 रोजी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, एबीपी वृत्तवाहिनीचे कार्यकारी उपाध्यक्ष राजीव खांडेकर, प्रसिध्द अभिनेत्री सोनाली कुलकर्णी या मान्यवरांच्या हस्ते हा सन्मान सोहळा झाला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या वृत्तपत्राचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या, त्याचबरोबर संघटनेच्या माध्यमातून राज्यभर राबवलेले सामाजिक उपक्रम आणि एओन प्लेच्या माध्यमातून डिजीटल माध्यमात केलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमाची दखल घेवून या पुरस्कारासाठी निवड केली. मान्यवरांच्याहस्ते हा पुरस्कार वसंत मुंडे यांना प्रदान करण्यात आला. राज्यभरातील उद्योग व विविध क्षेत्रातील निवडलेल्या विजेत्यांमध्ये प्रसारमाध्यम क्षेत्रातून निवडलेले वसंत मुंडे हे एकमेव. ग्रामीण भागातून राज्यस्तरावर आपल्या कार्याची छाप मुंडे यांनी निर्माण केल्यामुळे त्यांचा गौरव झाला. यापूर्वीही लोकमत मिडीया ग्रुपच्यावतीने दुबई येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवार्ड देवून त्यांना सन्मानीत करण्यात आले होते. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे राज्यभरातून अभिनंदन होत आहे.

**एबीपी माझाचा ‘अनमोल रत्न’ पुरस्कार नवीन उर्जा देणारा**
मराठी वृत्तवाहिन्यांच्या स्पर्धेतही ‘एबीपी माझा’ने आपले वेगळेपण जपले आहे. सामाजिक बांधिलकी आणि तळागाळातील लोकांचे प्रश्न मांडण्याला प्राधान्य दिले जाते. वाहिनीचे कार्यकारी उपाध्यक्ष राजीव खांडेकर यांच्या कल्पकतेतून समाजातील दुर्लक्षीत लोकांना जगासमोर आणले जाते. यावर्षी वृत्तपत्र आणि डिजीटल माध्यमातून नाविण्यपूर्ण कामाची दखल घेवून एबीपी माझाने अनमोल रत्न या पुरस्कारासाठी निवड केली. हा पुरस्कार अधिक चांगले काम करण्यासाठी नवी उर्जा देणारा आहे. अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.






# पोळा सणानिमित्त बाजारात गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील सोमवारच्या आठवडी बाजारात पोळा सणानिमित्त मोठ्या प्रमाणात साज असलेल्या दुकाना थाटण्यात आल्या होत्या. या आठवड्यात पोळा सण असल्यामुळे शेतकरी आपल्या सर्जा राजाच्या सजावटीसाठी चे साहित्य खरेदी करताना दिसत होते. शेतकऱ्याचा सन  पोळा या सणानिमित्त शेतकरी आपल्या शेतात राबणाऱ्या सर्जा राजा चा सजावटीसाठी घाग्रमळा, गोंडे, सर मोरख्या, पायातील पैंजण, हिंगोळ, बेगड, रंग, कासरा आदी नवीन साहित्य खरेदी करीत असतात  सोमवारचा आठवडी बाजारात शेतकरी  साहित्य खरेदी होते. करण्यासाठी  गर्दी झाल्याने बाजारात गर्दी दिसत होती.

**लम्पी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनावरांचा आठवडी बाजार बंद :** मागील आठवड्यात शासनाने लम्पी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासठी वडोद बाजार येथील सोमवारचा जनावरांचा बाजार बंद करण्याचा निर्णय घेतला होता त्यामुळे बाजार त गर्दी, दिसत होती. आठवडी बाजारात जनावरे खरेदी विक्री साठी आली नव्हती त्यामुळे बाजारावर त्याचा परिणाम झालेला दिसत आहे तर लमपी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून लसीकरण मोहीम सुरु करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांना लसीकरण करण्याचे आव्हान करण्यात आले आहे.

# बळीराजावरचे संकट दूर कर : मुख्यमंत्री

## भगवान भीमाशंकराकडे केली प्रार्थना

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. बळीराजावरचे संकट दूर कर, राज्यभर समाधानकारक पाऊस पडू दे. राज्यावरचे संकट दूर होऊन राज्य सुजलाम सुफलाम होऊदे; राज्यातील सर्व घटकांना सुख, समाधान आणि आनंद मिळू दे, अशी प्रार्थना भगवान भीमाशंकराकडे मुख्यमंत्र्यांनी केली. पुजेनंतर मुख्यमंत्र्यांना भीमाशंकर देवस्थान ट्रस्टच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पोलीस अधीक्षक अंकित गोयल, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, भाविक श्रद्धेने आणि भक्तीभावाने येथे दर्शनाला येत असतात. मी दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रावणी सोमवारी दर्शनासाठी आलो आहे. येथे लाखो भक्त येत असल्याने शासनाने १४८ कोटींचा विकास आराखडा तयार केला आहे. आतापर्यंत त्यातील ६८ कोटी विविध सुविधांवर खर्च करण्यात आला आहे. येथे येणाऱ्या भाविकांची कुठलीही गैरसोय होणार नाही अशा सर्व मूलभूत सुविधा शासनाच्या माध्यमातून दिल्या जातील. परिसरात स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि स्नानगृहाची व्यवस्था करण्याचे, तसेच परिसरातील आदिवासी पाड्यात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

# अवतीभवतीच्या माणसांचे प्रेम म्हणजे राष्ट्रीयत्व : राजेंद्र नाईकवाडे

## चंद्रपूरचा इतिहास शोधणारे दत्ताजी तन्नीरवार यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीयत्व ही एक अतिशय व्यापक संकल्पना असुन स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात भावनेचं रुप तेवढं बदलतंय एवढाच काय तो फरक . परंतू स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्यात राष्ट्रीयत्वाची भावना ओतप्रोत भरली होती ती बांधीलकी आज थोडी कमी जाणवतेय अस मत नागपूर येथिल प्रा. राजेंद्र नाईकवाडे यांनी व्यक्त केले. अखिल भारतीय साहित्य परिषद आणि ईतिहास संकलन संस्था, शाखा चंद्रपूर च्या वतीने आयोजीत भारतीय साहित्यातील राष्ट्रीयत्वाची सुत्रे या विषयावर व्याख्यान व चंद्रपूरातील ईतिहास संशोधक दत्ताजी तन्नीरवार यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शाम मोहोरकर, सत्कारमूर्ती दत्ताजी तन्नीरवार, चंद्रकांत गुंडावार, अ.भा.सा.परिषद विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष अविनाश पाठक , अध्यक्ष प्रा. परमानंद बावनकुळे आदिंची उपस्थिती होती.

यावेळी भारतीय साहित्यात राष्ट्रीयत्वाची सुत्रे या विषयावर आपलं मनोगत व्यक्त करतांना डॉ. नाईकवाडे यांनी राष्ट्रीयत्व ही एक निरपेक्ष संकल्पना असुन ती सर्वत्र आढळून येते , भाषा , वंश व संस्कृती ही राष्ट्रीयत्वाच्या संकल्पनेत सामावलेली असतात. मी कडून आम्ही कडे होणारा प्रवास म्हणजे राष्ट्रीयत्व असे विचार मांडत असतांना त्यांनी राष्ट्रीयत्वाच्या विविध मान्यवरांनी मांडलेल्या व्याख्या, संकल्पना उपस्थितांसमोर ठेवत राष्ट्रीयत्वाची सुत्रे स्पष्ट केली. ज्ञानेश्वर, तुकाराम , राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, मिराबाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी , सावरकर अशा सगळ्याच्यांच साहित्यातील राष्ट्रीयत्वाची सुत्रे , बिजे ,यावरही त्यांनी प्रकाश टाकला. तर काही विचारवंत आता राष्ट्रीयत्व या संकल्पनेच्या विरोधात उभी ठाकली आहेत हे चुकीचे असल्याचे स्पष्ट मतही त्यांनी यावेळी मांडले.  चंद्रपूरातील ज्येष्ठ ईतिहास संशोधक दत्ताजी तन्नीरवार यांचाही वयाच्या ९३ व्या वर्षी सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलतांना दत्ताजी तन्नीरवार यांनी आपला आवड नसलेल्या ईतिहासाच्या विषयातील प्रवास व त्यातून पुढे त्यांनी केलेल्या सहा पुस्तकांच लेखन हा प्रवास आपल्या मनोगतातून मांडत ईतिहासाच्या अभ्यासाने मनुष्याची बुद्धी प्रगल्भ होते असे विचार मांडले. अविनाश पाठक यांनी अ.भा. सा.परिषदेची भुमिका यावर प्रकाश टाकत राष्ट्रीय विचारांची पेरणी करणार साहित्य निर्माण व्हावं व ते या देशातल्या सामान्य माणसापर्यंत पोहोचावं यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत असे मत मांडले.

प्रा. बावनकुळे यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनामागची भुमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयश्री शास्त्री यांनी तर आभार डॉ. दिपक लोणकर यांनी मानले मान्यवरांचा परिचय डॉ. पल्लवि ताजने यांनी करून दिला. या कार्यक्रमाला. संपूर्ण जिल्ह्यातील अनेक मान्यवर, ईतिहासाचे विद्यार्थी यांची उपस्थिती होती.



# कुणबी सेनेचा इशारा

आधुनिक केसरी

राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्यास कुणबी सेनेचा अजिबात विरोध नाही. फक्त हे आरक्षण इतर मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातून देऊ नये. या प्रवर्गातून आरक्षण दिल्यास या प्रवर्गातील ३७० दुर्बल घटकांतील जातींवर अन्याय होईल, अशी भूमिका वेळोवेळी मांडुनही शासनाने मराठवाड्यातील मराठा समाजास कुणबी जात प्रमाणपत्र देण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या सगळ्या प्रक्रिये विरुध्द कुणबी सेना मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यासाठी प्रयत्नशील आहे, अशी माहिती कुणबी सेनेचे प्रमुख विश्वनाथ पाटील यांनी दिली. यापूर्वी मराठा समाजाला दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयातने रद्दबातल ठरविले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी शासन विविध माध्यमातून प्रयत्न करत आहे. असे असताना जालना येथे मनोज जरांगे पाटील हे सरकारवर दबाव टाकून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करत आहेत. दबावातून मराठा समाजाला आरक्षण मिळून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अशा पध्दतीने प्रत्येक जातसमूह आंदोलन, उपोषण करू लागला तर आरक्षणाच्या बाबतीत राज्यात अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती पाटील यांनी व्यक्त केली. त्यामुळे आपण जरांगे यांना अटक करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, असे पाटील म्हणाले. सनदशीर मार्गाने आंदोलन, उपोषण करुन आरक्षणासाठी कोणी लढत असेल तर त्याला आमचा विरोध नाही. आक्रमक दबाव हा आरक्षण पदरात पाडून घेण्याचा मार्ग नाही. त्याला आमचा विरोध आहे, असे पाटील यांनी स्पष्ट केले. कोकण कुणबी विकास समितीचे अध्यक्ष शामराव पेजे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मे १९८२ मध्ये शासनाला दिलेल्या अहवालात कोकणात बहुसंख्येने असलेल्या कुणबी समाजाच्या हलाखीचे वर्णन करुन या समाजाला इतर समाजाप्रमाणे आरक्षण देणे किती महत्वाचे आहे हे स्पष्ट केले आहे. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७० टक्के असलेल्या या समाजाला कधीच आरक्षणाचा लाभ मिळाला नाही. आरक्षणा अभावी या समाजाचे लोकप्रतिनिधी यापूर्वी विधीमंडळात निवडून गेले नाहीत. या समाजाच्या प्रश्नांना कधीच शासन दरबारी प्रभावीपणे कोणी मांडले नाही. आता कोकणात १९ आमदार आहेत. त्यामधील किती कुणबी आहेत, असा प्रश्न विश्वनाथ पाटील यांनी केला. शासनाने केवळ निवडणुकांचा विचार न करता कुणबी समाजाला इतर जात समुहावर अन्याय न करता कायमस्वरुपी आरक्षण मिळेल याद्दष्टीने विचार करावा. वंशावळीचा नवीन विषय पुढे करुन हेतुपुरस्सर कुणबी समाजाला आरक्षणा पासून वंचित ठेवण्यासाठी प्रयत्न करू नये. या आमच्या रास्त मागण्या आम्ही शासनाकडे केल्या आहेत. त्याच्याकडे लक्ष न देता शासन परस्पर अध्यादेश आणि कुणबी सेनेला विश्वासात न घेता आरक्षणाचा विचार करणार असेल तर याप्रकरणी आम्ही उच्च न्यायालयात लवकरच याचिका दाखल करणार आहोत, असे कुणबी सेनाप्रमुख पाटील यांनी सांगितले. उपोषणकर्ते जरांगे यांच्या अटकेची मागणी केल्याने विश्वनाथ पाटील यांना चार जणांनी त्यांच्या मोबाईलवर शिवगीळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आहे.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# आंबेडकरवादी नेत्यांनी एकत्र यावे !

आधुनिक केसरी

**बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आम्ही काम करतो व संविधानीक मार्गाने सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देतो आणि संविधानाचे संरक्षण करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर असतो असे बोलुन अनेक सामाजिक संघटना, राजकीय पक्ष तयार झाले. बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर आंबेडकरवादी अनुयायांना भ्रमीत करून समाजकारणाच्या नावाखाली राजकारण केले जाते. संविधानाला हात लावला तर हात तोडण्याची भाषा करणारे, आंबेडकरवादी अनुयायांवर अन्याय अत्याचार झाल्यावर न्याय मिळेपर्यंत शांत बसणार नाही अशा थापा मारणारे अनेक राष्ट्रीय नेते महाराष्ट्रासह देशात निर्माण झाले. मीच आंबेडकरी चळवळीचा शिलेदार असल्याच्या तोऱ्यात वावरणाऱ्यांची संख्या कमी नाही.**

आज समस्या वाढत आहेत, संविधानाची अंमलबजावणी जवळपास नसल्यात जमा आहे, समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य, शिक्षण, आरक्षण ह्या बाबी फक्त संविधानाच्या पुस्तकात बंद आहेत. देशाची अर्थ व्यवस्था उद्योगपतींच्या घशात तर राजकीय व्यवस्था लुटारू च्या घशात गेली आहे. तरीही स्वंयघोषणा करणारे आणि स्वतः ला बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी समजून गटतटाच्या नावाखाली स्वतः ची दुकानदारी चालवणाऱ्यांनी आता तरी शहाणे व्हावे. बाहेर राहुन किती ही ओरडलो तरीही काहीच परिणाम होणार नाही. त्यासाठी आत जाणे आवश्यक आहे. आणि आत जायचे असेल तर सर्वांनी एकत्र येऊन माण पान पदाची अपेक्षा न करता चळवळीचा कार्यकर्ता म्हणून काम करावे. आज बेकीने आहात एकही आमदार खासदार नाही, एक झाले तर किमान काही आमदार आणि खासदार निवडून येतील. ते लोक आत मध्ये सर्वसामान्य लोकांच्या शिक्षण, आरोग्य, नोकरी, सामाजिक न्याय, सामाजिक समतेचे मुद्दे मांडून लोकशाही चे जतन करून सर्वसामान्य लोकांच्या समस्या तरी मांडतील. सर्व जन खरचं बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने खरचं चळवळीचे काम करत असाल तर चळवळ करताना कसला मान पान आणि पद घेऊन बसलात. घरची भाकरी बांधुन चळवळीची बांधणी करून लोकांच्या हक्क अधिकारासाठी लढणारी फळी आज थकली आहे. म्हणून दुसऱ्या फळीची जबाबदारी आजच्या सर्वच नेत्यांवर आणि अनुयायांवर आलेली आहे. शिक्षणाचा बाजर करून मुलांचे शिक्षण महाग केले, सार्वजनिक मालमत्तेचे खाजगीकरण करून आरक्षण बंद केले म्हणजेच शिक्षण आणि आरक्षण बंद केल्याने विकासाचे मार्ग च बंद होताना जर प्रत्येक जन स्वतः चे स्वयंघोषित राष्ट्रीय पद घेऊन बसत असेल तर संविधान, चळवळ व सर्वसामान्य लोकांच्या समस्या यावर कोणी बोलायचे? स्वतः ला आंबेडकरवादी समजून घेताना पहिले बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य समजून घेणे गरजेचे आहे. केवळ बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन आपण फक्त आपली स्वतः ची जाहिरात करू शकतो. परंतु चळवळ टीकवू शकत नाही किंवा तिला बळकटी देऊ शकत नाही. बाबासाहेबांनी दिलेला संदेश व त्यांचे विचार न माणणाऱ्या लोकांना मी आंबेडकरवादी चळवळीचा नेता आहे असे म्हणण्याचा नैतिक अधिक मुळीच नाही. चार पाच बेरोजगार तरुणांना सोबत घेऊन फिरल्याने कोणी राष्ट्रीय नेता होत नाही. प्रत्येक गटातील चार पाच चार पाच तरुण व स्वयंघोषित राष्ट्रीय नेता एकत्र आले तर चळवळीला मात्र आपण राष्ट्रीय स्तरावर पोहचवू शकतो. म्हणून अजूनही आंबेडकरवादी नेत्यांनी शहाणे होऊन एकत्र येणे आवश्यक आहे. आणि ज्या कोणाला एकत्र यायचेच नसेल, चळवळीच्या नावाखाली स्वतः ची दुकानदारी चालवून चार पाच बेरोजगार तरुणांच्या सहकार्याने राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मिरवायचे असेल तर खुशाल मिरवा फक्त तुम्ही बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊ नका. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कोणाचीही खाजगी संपत्ती नाही. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन स्वतः चे पोटभरणे व स्वतः ची दुकानदारी चालवणे बंद करून आपण नैतिक आहोत हे तरी सिद्ध करावे. आंबेडकरवादी चळवळ ही स्वार्थकेंद्रीत नसून ती समाजातील शेवटच्या घटकाला विकासाची संधी निर्माण करून देणारी आहे. परंतु आज बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने स्वतः चेच पोटभरण्याचे उद्योग सुरू केले आहेत. चळवळीच्या नावाखाली स्वतः ची दुकानदारी थाटणे, मीच खरी चळवळ चालवतो, मलाच बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व




कार्य समजले, माझ्या शिवाय सर्वसामान्य लोकांना न्यायच मिळू शकत नाही, कुठेही अन्याय अत्याचार झाला तर मीच सर्वात अगोदर तिथे जातो अशा अविर्भावात राहणाऱ्यांनी चळवळीचे काम नाही केले तरी चालते. अशा लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आंबेडकरवादी चळवळीचे नाव घेऊच नाही. बाबासाहेब आंबेडकर व आंबेडकरवादी चळवळीचे नाव न घेता भाऊ तुम्ही आतंरराष्ट्रीय नेता बना, स्वतः ची दुकानदारी खुप मोठी करा जनतेला काहीच फरक पडणार नाही. परंतु जर बाबासाहेब आंबेडकर यांचे व आंबेडकरवादी चळवळीचे नाव घेऊन गटातटात राहत असाल तर लोकांच्या प्रश्नांना उत्तरेच द्यावे लागणार नाही तर लोकांच्या मर्जीने राहवे लागेल. म्हणुन सध्या आंबेडकरवादी लोकांची एकच ईच्छा आहे ती म्हणजे सर्वांनी एकत्र येऊन पद पैसा याची अपेक्षा न करता एक कार्यकर्ता म्हणून काम करावे. एकिकरणात जी जबाबदारी देण्यात येईल ती पार पाडून आपल्या हक्काचे प्रतिनिधी आपल्याला निवडून आणणे आवश्यक आहे. आणि पद पैसा बाजूला सारुन एकत्र येता नसेल तर भाऊ तुम्ही स्वतः ला आंतरराष्ट्रीय नेते म्हणुन जरी घेतले तरीही लोकांना त्याचे काहीच घेणे देणे नाही आणि तुमच्या पदाचा जनतेला फायदा पण नाही. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेले संदेश आम्हाला बरोबर कळाले नाही अर्धवट वाचुन समजून न घेता उठ सुट जो तो राष्ट्रीय नेता होत आहे. पण नेत्याचे कोणतेही काम मात्र करत नाही. बाबासाहेब आंबेडकर यांनी शासन कर्ती जमात बनायचे सांगितले आणि आम्ही भाषण करते बनलो. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकजूट करून संघर्ष करायला सांगितले आम्ही फुट पाडून पोटासाठी संघर्ष करायला लागलो, स्वयंघोषित राष्ट्रीय नेते अनेक आहेत परंतु एकाही नेत्याने स्वतः च्या गावातील गोर गरिब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्याला स्वतः च्या पायावर उभे करायला मदत केली नाही. आंबेडकरवादी चळवळीला हजारो नेते आहेत, लाखों लोक सुशिक्षित आहेत, हजारो लोक भाषणे करतात, परंतु आंबेडकरवादी चळवळीचा स्वतः चा मिडिया उभा करता आला नाही. आणि जे काही वृत्तपत्र चळवळीचे खऱ्या अर्थाने काम करतात त्या वृतपत्रांना सहकार्य करून ते वाढवताही आले नाही. जेव्हा लोकांना वाचता येत नव्हते, लोकांकडून जाहीराती येत नव्हत्या तेव्हा बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चार चार वृत्तपत्र स्वतः च्या खिशातून पैसा खर्च करून चालवले, मुकनायकला राजर्षी शाहु महाराज यांनी राजाश्रय देऊन मदत केली. परंतु आज लोकांकडे पैसा आहे, वाचक आहेत, जाहीराती आहेत तरीही चळवळीतील वृतपत्रांना मदत न करता इतरांचे घरे भरणाऱ्या लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याचा कुठलाच अधिकार उरत नाही. म्हणून एक व्यक्ती सर्व काम करू शकत नाही म्हणून सर्व जन एकत्र येऊन एक एक काम केले तर सर्व काम झाल्याशिवाय राहत नाही. परंतु याची जाणीव लोकांना राहीली नाही. राष्ट्रीय नेत्यांच्या नावाखाली स्वतः च्या दुकानदारी व चळवळीशी बेईमानी करण्यात धन्यता माणणारे अनेक लोक आहेत. स्वयंघोषित राष्ट्रीय अध्यक्ष एकत्र आले तर कोणी राजकीय क्षेत्र बघेल, कोणी शैक्षणिक क्षेत्र बघेल, कोणी सामाजिक तर कोणी मीडियाचे क्षेत्र बघेल, सामाजिक निधी संकलन करून शिक्षणसंस्था, आरोग्य संस्था, बँक उद्योग निर्माण करून तरूणांना रोजगार निर्माण होईल. सामाजिक, राजकीय वजन वाढेल. चळवळीला मोठा मिडिया मिळून चळवळीची गती वाढेल. कारण चळवळीला वृत्तपत्र नसेल तर त्याची गत पंख छाटलेल्या पक्षा प्रमाणे असते ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण आम्ही विसरून गेलो. एकत्र आले तर केवळ राजकीय च नाही तर सर्वांगीण फायदे होऊन समाजाच्या हिताचे काम करून समाजाला विकासाच्या स्थानावर नेऊ शकतो. म्हणून स्वतःची दुकानदारी बंद करून, स्वयंघोषित राष्ट्रीय अध्यक्ष बाजूला सारून, एकमेकांना बद्दलचे मतभेद विसरून केवळ आणि केवळ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी निर्माण केलेल्या मार्गाने जायचे. स्वतः नवीन मार्ग तयार करण्याचा प्रयत्न करू नये. कारण ते शक्य नाही. आणि सध्या वेळ आहे एकत्र येण्याची म्हणून सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक, आर्थिक, राजकीय उन्नतीसाठी हातभार लावावा हिच एक अपेक्षा.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# आचरणातून निर्माण झालेलं श्रेष्ठत्व हे चिरकाल टिकणारे वैभव

आधुनिक केसरी

**५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर या कालावधीत आपल्याच देशात एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा होणार असून या स्पर्धेपसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी ४ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. या संघात रोहित शर्मा व युवा शुभमन गिल हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची सुरवात करतील. तर मधल्या फळीची जबाबदारी विराट कोहली, सुर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर तसेच यष्टीरक्षक ईशान किशन यांच्यावर टाकण्यात आली. अनुभवी के एल राहुल या आणखी एका अतिरिक्त यष्टीरक्षकाला संधी देण्यात आली आहे.**

जगात सगळं काही क्षणभंगुर असलं तरी सुद्धा आचरणातून निर्माण झालेलं श्रेष्ठत्व हे चिरकाल टिकणार वैभव आहे आणि हेच वैभव आयुष्यात निर्माण करता आलं पाहिजे. अधिकार पद ही क्षणभंगुर असतात त्याची एक विशिष्ट अशी काल मर्यादा असते. याच दरम्यान त्या त्या पदाचा अधिकाराचा जो प्रभाव आहे त्यामुळे आपल्याला त्याच वेगळं महत्व जाणवतं आणि आपण श्रेष्ठ झाल्याची जाणीव आपल्याला होऊ लागते .पण काल मर्यादा संपली कि त्याचा प्रभाव संपुष्टात येतो .आणि पुन्हा आपण मुळ ठिकाणी येतो. जीवनात पदा मुळे अधिकारा मुळे प्रसिद्धी मिळू शकते. नाव लौकीक होऊ शकत संपत्ती प्राप्त होऊ शकते. परंतु पदांमुळे श्रेष्ठत्व मिळत नाही. श्रेष्ठत्व हे आपल्या विचारांवर आचारावर अंवलबून असतं. म्हणून श्रेष्ठत्व हे पद पैसा श्रीमंती, सत्ता, वैभव यामुळे प्राप्त होत नाही. तर विचारांची दिशा उंची आणि विचार व कृती यामधील साम्य यामुळे श्रेष्ठत्व प्राप्त होत असत. तसं पाहिलं तर श्रेष्ठत्वा बदल प्रत्येकाचं मत विचार भिन्न असु शकतात. या संदर्भात व्यक्ती परत्वे मत भिन्न असण या मध्ये काही गैर नाही. कारण आपण आपल्या सोयीनुसार श्रेष्ठत्व ठरवत असतो. अनेकदा आपला पंस्वार्थ, हित, लाभ यामुळे पण आपण समोरच्या व्यक्तीला तात्पुरतं श्रेष्ठ ठरवतो.हा मानवी स्वभाव आहे. आपण ज्या पद्धतीने निरीक्षण करतो त्याच पद्धतीचा परिणाम आपल्याला दिसतो हे नैसर्गिक आहे. पण एकंदरीत मुल्यमापन हे योग्य पद्धतीने झालं तर मग मात्र श्रेष्ठत्व हे अधिकाराने पदाने संपत्ती वैभावाने नाही तर आचरण, विचार व संस्काराने च प्राप्त होते आणि आपली खरी गल्लत ही खरं श्रेष्ठत्व ओळखण्यात होते. भौतिक मोठेपणा पद, पैसा, वैभव, अधिकार हे क्षणिक व क्षणभंगूर असतात. कितीही प्रयत्न केले तरी त्याला एक विशिष्ट अशी काल मर्यादा असते. त्यापुढे तो प्रभाव चालत नाही. काल मर्यादा संपली की पद अधिकार मोठेपणा हा आपोआप संपुष्टात येतो. म्हणजे अधिकार पद, प्रतिष्ठा, मोठेपणा हा अस्थायी असतो. तर याउलट श्रेष्ठत्व हे स्थायी असतं. उच्च किंवा सर्वोच्च पदावर विराजमान होण यांचा अर्थ श्रेष्ठ होणे असा मुळीच होत नाही. या मध्ये अपवाद मात्र असू शकेल. योगायोगाने जो पदाने मोठा झाला तो आचर विचारानेही श्रेष्ठ असू शकतो पदाने अधिकाराने संपत्ती, वैभवाने व आचार विचारानेही जो श्रेष्ठ असतो. तो राजयोगी असतो अशा अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही अपवाद वगळता इतरांच्या संदर्भात मात्र खरया अर्थाने उच्च पराकोटीचे विचार आत्मसात केल्याने श्रेष्ठत्व प्राप्त होते. हल्ली आपल्या कडे शब्दांची फार गल्लत होते आणि याच शब्द फेऱ्यात येऊन आपण नेमकं कशाला काय समजतो हेच आपल्याला शेवटपर्यंत कळत नाही. अशीच काहीशी स्थिती सध्या सगळीकडे आपल्या सर्वांची झालेली आपल्याला पाह्यला मिळत आहे. म्हणून कोण कोणाला काय समजत आहे. याचा थांगपत्ता लागयला तयार नाही. एकंदरीत पाहिलं तर श्रेष्ठत्व हे पदाने अधिकाराने नाही. तर उच्च पराकोटीच्या विचाराने आचाराने प्राप्त होते हे युगायुगाचे सत्य आहे. योगायोगाने एखाद्या पदावर एखाद्या व्यक्तीला अधिकार मिळाला किंवा ज्या पदाला आपण उच्च दर्जाचे पद समजतो संबोधतो अशा पदांवर निवड झाली म्हणजेच तो व्यक्ती श्रेष्ठ झाला असंच काहीसं आपलं असं सर्वसाधारण निरीक्षण असतं. कारण आपण ज्या भूमिकेतून पाहतो ती भूमिका ही भौतिक विचार आणि सुख सुविधा या बाबींच्या संदर्भात असल्याने आपण त्याच पद्धतीने विचार करतो आणि तात्कालीन परिस्थितीमध्ये आपल्या दृष्टीने ते योग्य पण आहे. कारण आपली दृष्टी तशी आहे. परंतु ते पूर्ण सत्य नसून अर्धसत्य आहे. कारण तात्कालिक प्रभावाने तो व्यक्ती लोकांच्या नजरेत भौतिक दृष्ट्या मोठा असेलच. यामध्ये किंचित यत्किंचितही सुद्धा शंका नाही. परंतु तो श्रेष्ठ आहे. असं म्हणणं नैसर्गिक दृष्ट्या अजिबात संयुक्तिक होणार नाही. अधिकार पद आणि विचार ह्या तीन बाबी एकत्र ज्यांच्या संदर्भात आढळतील असे व्यक्तिमत्व यामध्ये अपवाद नक्कीच असतील परंतु शरतेशेवटी श्रेष्ठत्व हे उच्च श्रेणीचे विचार अंगीकृत आत्मसात केल्याशिवाय प्राप्त होत नाही.महणुन भौतिक मोठेपणा हा फक्त क्षणिक असतो. तर विचाराने ज्ञानाने मिळालेलं श्रेष्ठत्व हे स्थीयी शाश्वत असतं . म्हणून पदाने मोठं होण्यापेक्षा विचाराने मोठ होऊन श्रेष्ठत्व मिळवणं कधीही उत्तमच आहे. शेवटी पद अधिकार हे फार काळाचे सोबती नसतात. तर विचाराने मिळालेलं श्रेष्ठत्व हे चिरकाल टिकणार अभुषण आहे. अलंकार ज्याला कोणताही कसालाही डाग बट्टा नाही. ते अगदी शुद्ध आहे. म्हणून आचार विचार हेच आभूषण जीवनातील सगळ्यात मोठा दागिना आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# साहित्याच्या माध्यमातून हिंदी भाषेचे सौंदर्य समाजापर्यंत पोहचवा

## आ. किशोर जोरगेवार : कनिष्ठ महाविद्यालय हिंदी अध्यापक संघाच्या वतीने 'उडान' हिंदी दिवस समारोहाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** हिंदी आपली राष्ट्र भाषा आहे. या भाषेचा मोठा इतिहास राहला आहे. त्यामुळे या भाषेचे जतन करत या भाषेतील साहित्य जपून या साहित्याच्या माध्यमातून हिंदी भाषेची संदुरता समाजा पर्यंत पोहचवा असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

रेंजर कॉलेज येथे हिंदी अध्यापक संघाच्या वतीने 'उडान' हिंदी दिवस समारोह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत. या कार्यक्रमाला चंद्रपूर हिंदी अध्यापक संघाचे राज्य अध्यक्ष डॉ. मिलिंद



कांबळे, माध्यमीक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. बानो सरताज काजी, अनिल शिवणकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, हिंदी अध्यापक संघाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विदर्भातून आलेल्या अध्यापक आणि हिंदी साहित्यिक यांच्यावर हिंदी भाषेचे महत्व प्रत्येक घटका पर्यंत पोहचविण्याची मोठी जबाबदारी आहे. हिंदी ही राज्य भाषा असली तरी ग्रामिण भागात हिंदी भाषेचा हवा तसा वापर केल्या जात नाही. त्यामुळे अशा आयोजनातून यावर चिंतन मंथन करण्याचे काम झाले पाहिजे. अद्यापकांच्या आणि साहित्यिकांच्या माध्यमातून हे काम होणे अपेक्षित असल्याचेही ते यावेळी म्हणाले. हिंदी दिवसा निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करत असतांना या भाषेतील साहित्यांवरही आपण प्रकाश टाकला पाहिजे. असे आयोजन गरजचे असून ते नियमित झाले पाहिजे, यात लोकप्रतिनीधी म्हणून शक्य ती सर्व मदत करण्याची आपली तयारी असल्याचे यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

या कार्यक्रमात सेवा निवृत्त शिक्षिका वैशाली मद्दीवार यांनी व्हिडीओच्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांच्या संघर्षमय जिवनावर प्रकाश टाकला त्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात अध्यापक संघ चंद्रपूर जिल्हा कार्यकारणी, वर्धा जिल्हा कार्यकारणी आणि गोंदिया जिल्हा कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# पैठण तालुका शिक्षक सेवकाची सहकारी पतसंस्थेची ५६ वी वार्षिक सभा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** औरंगाबादचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या प्रमुख उपस्थिती पैठण तालुका शिक्षक पतसंस्थेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. संस्थेचे चेअरमन तथा शिक्षक सेनेचे अध्यक्ष अमोल एरंडे यांनी अहवाल वाचन करुन अर्थिक वर्षांत बँकेने केलेल्या कामकाजाच्या आढावा वाचून शिक्षक व पतसंस्थाच्या विषय पालकमंत्री यांच्या कडे पतसंस्थाचे गंगाजळी मधुन खर्च करण्याची मागणी, सि.सि .लोनवर व्याज मिळावे, पतसंस्था नवीन ईमारतीसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी, पतसंस्थाचे खाते ऑनलाईन करण्यात यावे व त्या खात्यातून फोन पे सुविधा, शिक्षकाला अध्यापना पेक्षा जास्तीचे शाळा बाह्य कामे कमी करा, ऑनलाईन झालेल्या बदल्या झालेल्या शिक्षकाना पुन्हा तालुक्यात आना, शिक्षकाचे मेडिकल बिले कँशलेस पध्दतीने द्यावे. शिक्षकाच्या विविध मागण्या मंत्रीमंडळात मांडुन निर्माण घेऊ तसेच शिक्षकाला अध्यापना शिवाय ईतर कामे नको, तालुक्यातील शाळेचा विकास करून सुंदर शाळा करू, महाराष्ट्रातील सगळ्या शाळेला रो.ह.यो. अंतर्गत वाल कंपाउंड देण्यासाठी सरकार कटीबद्ध. जलजीवन अंतर्गत तालुक्यातील शाळेला जि.प. पाणी पुरवठा करणार असुन शाळेला वाढीव वर्ग खोल्याचे नियोजन चालु असुन शिक्षक पतसंस्थाच्या साठी जिल्हा बँकेच्या माध्यमातून अध्यक्ष एरंडे यांनी मागण्या पुर्ण करू असे आश्वसन दिले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई दूध संघाचे संचालक नंदलाल काळे, बळीराम औटे,दादा बारे, राम एरंडे, शाम तांगडि, विनोद बोबले, व्हॉ. चेअरमन राम तांगडे, सचिव महेश लबडे,प्रविण वाघमोडे, संचालक कैलास मिसाळ,पांडुरंग गोर्डे, आमोल मिसाळ, आबासाहेब टकले, श्रीकांत कराड, गजानन नेहाले,माणिक नल्लेवाड, अजिनाथ दहीफळे, रोहीणी देहाडराय, अमृता भुमरे, शमिम पठाण, शौकत पठाण, गणपत मिटकरसह शिक्षक सभासद उपस्थिती होती.



# बुलढाण्यात डुकरांना ठार मारण्याचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्हा मुख्यालय असलेल्या बुलढाणा शहरातील डुकराना 'अफ्रिकन स्वाईन फिव्हर'चा संसर्ग झाल्याने त्यांना ठार मारण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. गेल्या महिन्याभरात हजारो डुकरांचा अचानक मृत्यू झाला आहे. पशु संवर्धन विभागाच्या मार्गदर्शनात बुलडाणा नगरपालिकेने मेलेल्या डुकरांच्या अवयवाचे नमुने तपासणीसाठी पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविले होते.



# फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार मोफत आरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** हृदय दिनानिमित्त मेडीकव्हर हॉस्पिटल्सतर्फे मोफत आरोग्य शिबिर मोफत तपासणी उपचार शास्त्रांक्रिया पिवळे व केशरी राशनकार्ड धारकासाठी महात्मा ज्योतिबा फूले जन आरोग्य योजना मुख्यमंत्री आरोग्य योजना व आयुष्मान भारत आरोग्य योजनाचा विशेष लाभ शहरातील नामांकित हॉस्पिटलच्या सहकार्याने शेवटच्या गरजू रुग्णाच्या आरोग्याच्या सेवेत सतत कार्य करनार विजय औताडे प्रतिष्ठान वतिने मोफत आरोग्य शिबिर आयोजीत करण्यात आलेले असुन जास्तित जास्त नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेरी उपसरपंच गोपाल वाघ, डॉ. विक्रात देशमुख, साबेर पठाण गोविंद पाडे, ग्राम पंचायत सदस्य शेख राजीक, शुभम गंगावणे ग्रामसेवक पात्रे जना शिंगारे नितीन सदावर्ते ताजामत शहा दत्तू वाघ, बाळू भारती, कृष्णा सहाने, बाळू वायकोस, आजिनाथ वाघ, सलमान शेख, विजू वाघ काही डॉक्टर उपस्थित होते. ग्रामपंचायत कर्मचारी शेख, शकील शेख, सद्दाम बाळू वाघ, संजू मंदाडे, बळीराम कोलते, गणेश दनके, सुमित्राबाई दनके, नागरिक उपस्थित होते




महाराष्ट्र Business Katta














श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# मधुमेहामुळे कोणते दुष्परिणाम उद्भवतात ?

आधुनिक केसरी

**मधुमेह- डायबेटिस मेलिटस या आजारात माणसाच्या शरीरातले स्वादुपिंड पुरेसे इन्शुलिन तयार करू शकत नाही प्रकार १ किंवा शरीरातील तयार झालेल्या इन्शुलिनला पेशींकडून पुरेसा प्रतिसाद मिळत नाही प्रकार २. या दोन्ही प्रकारात पेशींमध्ये ग्लूकोज शोषण्याच्या क्रियेत अडथळा येतो. मधुमेहाच्या रुग्णांमधे मूत्रविसर्जनास वारंवार जावे लागणे, थकवा, सतत तहान आणि भूक लागणे, वजन कमी होणे अशी लक्षणे दिसतात. यावर उपाय म्हणजे खाण्याच्या सवयी बदलणे, तोंडाने घ्यावयाची औषधे, किंवा काहीं रुग्णामध्ये दररोज इन्शुलिनचे इंजेक्शन घेणे, यासोबतच दररोज व्यायाम करणे हा देखील एक महत्त्वपूर्ण उपचार आहे.**

यासाठी डॉक्टरकडे जाऊन आपल्या वयानुसार किंवा आपल्या जीवनशैलीनुसार व्यायामाचे प्रकार समजावून घेऊन व्यायाम केला तर मधुमेह बऱ्याच प्रमाणात आटोक्यात ठेवला जाऊ शकतो. श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी हे सुद्धा याच आजाराने त्रस्त आहेत, ते काही डॉक्टर नाहीत, परंतु लोकात याचे वाढते प्रमाण बघून ते व्यथित झाले. तपशीलः मधुमेह हा एक दीर्घकालीन उपाय करावे लागणारा आजार आहे. मधुमेहाने गंभीर स्वरूप घेतले म्हणजे मूत्रपिंड अर्धनिकामी वा पूर्ण निकामी होणे, हृदयविकार, पक्षाघात, कायमस्वरूपी वा तात्पुरते अंधत्व आणि सूक्ष्म रक्तवाहिन्या निकामी होणे, त्यामुळे पायामध्ये रक्तपुरवठा न होणे, जखमेमध्ये संसर्ग, जखमा लवकर बऱ्या न होणे, जखमा दूषित होणे असे दुष्परिणाम होतात.

पार्श्वभूमीः शरीरातील प्रत्येक पेशीस ऊर्जेची गरज आहे. शरीराचा ऊर्जेचा प्राथमिक स्रोत ग्लूकोज आहे. अन्नामधील कर्बोदकांचे- साखर आणि स्टार्चचे अन्ननलिकेमध्ये पचनांती ग्लूकोजमध्ये रूपांतर होते. ग्लूकोज रक्तामधून शरीराच्या सर्व पेशीपर्यंत गरजेप्रमाणे पोचविले जाते. इन्शुलिन हे संप्रेरक स्वादुपिंडामधील पेशीमध्ये तयार होते. स्वादुपिंड जठराच्या मागील बाजूस असते. स्वादुपिंड अन्नपचनासाठी आवश्यक विकरे तयार करते. ती स्वादुपिंड नलिकेद्वारे लहान आतड्यात येतात. पण स्वादुपिंडातील विशिष्ट पेशी समूहामध्ये इन्शुलिन आणि ग्लूकॅगॉन ही दोन संप्रेरके तयार होतात. ही दोन्ही संप्रेरके सरळ रक्तामध्ये मिसळतात. इन्शुलिनचा पेशीआवरणावरील ग्राहक प्रथिनाबरोबर संयोग झाल्याशिवाय पेशी आवरणामधून ग्लूकोज पेशीमध्ये जाऊ शकत नाही. रक्तामधील काहीं ग्लूकोजचे ग्लायकोजेनमध्ये आणि मेदाम्लामध्ये रूपांतर होते. ग्लायकोजेन आणि मेदाम्ले शरीराच्या अडचणीच्या वेळी उपयोगी पडणारा ऊर्जा साठा आहे. शरीरात पुरेसे इन्शुलिन नसल्यास रक्तामधील उपलब्ध ग्लूकोज पेशींना न मिळता रक्तामध्येच राहते. रक्तामधील ग्लूकोजच्या आधिक्यामुळे ग्लूकोजची पातळी वाढते. याला हायपरग्लायसेमिया- अधिक ग्लूकोज असणे म्हणतात. रक्तातील अधिक पातळीच्या ग्लूकोजमुळे रक्तामधील पाण्याची पातळी वाढते. थोडक्यात अधिक ग्लूकोज रक्तामध्ये अधिक पाणी. रक्तामधील पाण्याचे प्रमाण वाढल्यास मूत्रोत्सर्ग अधिक प्रमाणात होतो. मधुमेहाचे निदान आणि उपचार होण्याआधी रुग्णास सारखी तहान लागणे, अधिक पाणी पिणे आणि सारखे मूत्रविसर्जनास जावे लागणे अशी लक्षणे दिसतात. ही शरीरातील अतिरिक्त ग्लूकोज बाहेर टाकण्याची शरीराची प्रतिक्रिया आहे. मूत्रपरीक्षणामध्ये अशा वेळी ग्लूकोज आढळून येते. ज्यावेळी शरीर रक्तातील ग्लूकोज बाहेर टाकण्याचा प्रयत्न करीत असते तेव्हा पेशीना ग्लूकोजचा पुरवठा न झाल्याने अधिक ग्लूकोजचा पुरवठा करण्यासाठी संकेत मेंदूस मिळाल्याने रुग्णास अधिक भूक लागते. उपाशी पेशीना ग्लूकोज मिळण्यासाठी शरीरातील मेदाम्ले आणि प्रथिनांचे विघटन ग्लूकोजमध्ये होते. मेदाम्ले आणि प्रथिनांचे विघटन झाल्याने कीटोन उपपदार्थ बनतात. कीटोन उपपदार्थ मूत्रामध्ये आढळून येतात. अशा स्थितीस कीटोॲसिडॉसिस या नावाने ओळखले जाते. कीटोॲसिडॉसिस ही गंभीर स्थिती आहे. वेळीच उपचार न केल्यास कीटोॲसिडॉसिस झालेली व्यक्ती बेशुद्धावस्थेतून मरण स्थितीकडे जाऊ शकते.

मधुमेहाचे ठळक प्रकारः प्रकार -1- या मधुमेहास नवजात मधुमेह अशी संज्ञा आहे. पहिल्या प्रकारचा मधुमेह बालवयात किंवा प्रौढावस्थेमध्ये प्रकट होतो. या प्रकारात इन्शुलिन शरीरात अत्यंत कमी तयार होते किवा अजिबातच तयार होत नाही. नवजात मधुमेह उत्तर युरोपमधील फिनलंड, स्कॉटलैंड, स्कॅन्डेनेव्हिया, मध्य पूर्वेतील देश आणि आशिया येथे आढळण्याचे प्रमाण मोठे आहे. या मधुमेहास इन्शुलिन आवश्यक मधुमेह असेही म्हणतात; कारण या रुग्णाना दररोज इन्शुलिनचे इंजेक्शन घ्यावे लागते. पहिल्या प्रकारच्या मधुमेहाची आणखी एक आवृत्ती आहे. या रुग्णांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण सरासरीपेक्षा अधिक आणि कमी यांमध्ये हेलकावे खात असते. अशा रुग्णांना एक किंवा दोन प्रकारचे इन्शुलिन एकत्र करून त्यांची रक्तशर्करा नियंत्रित करावी लागते. प्रकार -२- दुसऱ्या प्रकारचा मधुमेह पन्नाशीच्या आत सहसा होत नाही. मधुमेहाच्या रुग्णांपैकी नव्वद टक्के रुग्ण दुसऱ्या प्रकारच्या मधुमेहाचे बळी ठरतात. या मधुमेहास प्रौढावस्थेमधील, वयोमानानुसार होणारा मधुमेह म्हणतात. अधिक शारीरिक वजन असणाऱ्या आणि



सतत बैठे काम करणाऱ्या, शारीरिक हालचाल, व्यायाम न करणाऱ्या व्यक्तींना दुसऱ्या प्रकारचा मधुमेह होण्याची शक्यता जास्त असते. स्थानिक अमेरिकन, हिस्पानिक, आफ्रिकन-अमेरिकन वंशाचे लोक, पूर्व भारतातले पाश्चिमात्य जीवनशैलीचा अंगीकार केलेले, जपान या लोकांना आणि ऑस्ट्रेलियन मूळ निवासी व्यक्तीमध्ये या प्रकारचा मधुमेह होण्याची शक्यता अधिक असते. दुसऱ्या प्रकारचा मधुमेह हा त्या मानाने सौम्य समजला जातो. आजाराची वाढ सावकाश होते. आहार आणि तोंडावाटे घेण्याच्या औषधांनी दुसऱ्या प्रकारच्या मधुमेहावर नियंत्रण ठेवता येते. या मधुमेहावर नियंत्रण ठेवले नाही किंवा दुर्लक्ष केले तर आजाराचे गंभीर परिणाम होतात. बरेच रुग्ण तोंडाने घेण्याची औषधे आणि आहारावर नियंत्रण ठेवून मधुमेहावर नियंत्रण ठेवतात. पण ही औषधे काम करेनाशी झाल्यानंतर इन्शुलिनची इंजेक्शने घ्यावीच लागतात. आणखी एक प्रकारचा मधुमेह गरोदरपणातील मधुमेह या नावाने ओळखला जातो. या आजारात मधुमेहाची लक्षणे दिवस गेल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या तिमाहीत दिसायला लागतात. दोन टक्के गरोदर महिलांना या प्रकारच्या मधुमेहाचा त्रास होतो. सन २००४मध्ये अमेरिकेतील ३५ टक्के महिलांना गरोदरपणातील मधुमेहाचा त्रास झाला होता. दहा वर्षामध्ये या प्रकारच्या मधुमेहाचे प्रमाण वाढले आहे. गरोदरपणात झालेल्या मधुमेहामुळे अपुऱ्या दिवसांचे बाळ जन्मणे किंवा बाळास जन्मतः ग्लूकोज न्यूनता किंवा कावीळ अशा आजारास सामोरे जावे लागते. यावर उपचार म्हणून आहार नियंत्रण आणि इन्शुलिनची इंजेक्शने द्यावी लागतात. ज्या स्त्रियांना गर्भारपणात मधुमेह झाला असेल, त्यांना पाच ते दहा वर्षात दुसऱ्या प्रकारच्या आजारास सामोरे जावे लागते. स्वादुपिंडाचे आजार, अतिमद्यपान, कुपोषण आणि शरीरावर ताण पडेल, अशा कारणांमुळे मधुमेह झाल्याची उदाहरणे आहेत.

मधुमेहीचा आहारः मधुमेह या आजाराच्या रोगींना आहारावर नियंत्रण ठेवावे लागते. मधुमेह आहारावर नक्कीच नियंत्रण ठेवण्यास भाग पाडतो. पण असे असले, तरी मधुमेह रोगींनी पूर्ण पौष्टिक आहार घेणे गरजेचे आहे. जर मधुमेहामध्ये आहारावर नियंत्रण नसेल, तर आरोग्य बिघडण्यासोबतच अनेक आजार होण्याची शक्यता वाढते. म्हणूनच डायबेटीज रोगींना माहित पाहिजे की त्यांच्यासाठी कोणता आहार योग्य आहे. मधुमेह असलेल्या लोकांना आणि सर्व सामान्य लोकांना हे माहीत असते की मधुमेह झाल्यास गोड खाणे चालत नाही. पण हे माहित नसते की खारट आणि आंबट देखील जास्त चालत नाही. तुरट, कडू आणि तिखट पदार्थ जास्त खावेत. मधुमेहाच्या रुग्णांनी पचन होण्यास हलका असलेला त्याचसोबत सहज मिसळणारे फायबर असलेले आहार घ्यावेत. लवकर पचणारी फळे उदा. टरबूज, पपई, बोर इत्यादी फळे. जे लवकर पचतात आणि आतड्याना साफ ठेवण्यास मदत करतात. मधुमेह आहार नियंत्रण ठेवण्यास हे पदार्थ मिठाई, चॉकलेट, साखर, केळी, तळलेले पदार्थ, सुका मेवा, चिक्कू, सीताफळ इत्यादी खाऊ नयेत.

मधुमेह झाल्यास तरल पदार्थ घ्यावेत. उदा. लिंबूपाणी, फळांचा रस, भाज्यांचा रस, सूप इत्यादी. यामुळे देखील मधुमेह नियंत्रणात येण्यासाठी मदत होईल. डॉक्टरकडून सल्ला घेऊन मधुमेह रोगी पौष्टिक आहारासाठी एक मधुमेह आहार तक्ता बनवून घेऊ शकतात. मधुमेह नसलेल्या व्यक्तीसाठी, उपवासाने उपवास करणारा रक्त शर्करा १०० मिलीग्राम/डीएल पर्यंत असावा. पूर्वी सामान्य जेवण साधारण ७० ते ९९ एमजी/ डीएल आहेत. जेवणानंतर दोन तासांनी घेतलेल्या पोस्टप्रेंडियल शर्करा १४० एमजी/डीएल पेक्षा कमी असावेत. हे लोक मधुमेहाशिवाय सामान्य आहेत.

प्रतिबंधः मधुमेहाचा प्रतिबंध आणि मधुमेह होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तीचा वेळ निघून जाण्याआधी शोध हे सध्या संशोधनाच्या टप्प्यात आहे. दुसऱ्या प्रकारच्या मधुमेहीमध्ये योग्य ते वजन राखणे, पुरेसा दररोज व्यायाम करणे, यामुळे मधुमेह लवकर होत नाही. शस्त्रक्रिया, मद्यपान, गर्भारपण, धूम्रपान अशामुळे मधुमेह होण्याची शक्यता वाढते. निरोगी राहण्याच्या सवयी आत्मसात केल्याने मधुमेह आणि मधुमेहासंबंधी गुंतागुंत टळते. १४ नोव्हेंबर हा दरवर्षी जागतिक मधुमेह दिवस म्हणून पाळला जातो.

# बोधपर गोष्टींमधून संस्कारक्षम शिकवण



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मानव हा समुहाने राहणारा असल्याने एकमेकांसोबत आपले अनुभव ,आनंद , दुःख व्यक्त करण्याच्या माध्यमातून कथन करण्याची कला विकसित होत गेली. या कथनाच्या प्रक्रियेद्वारे मानवी विचारांची प्रगल्भता वाढत गेली. कल्पनाविश्वातून निर्माण झालेल्या या गोष्टी , त्यातील राजा- राणी, झाडूवाली चेटकीण , जादुचा दिवा इत्यादी घटकांकडे लहान मुले आकर्षित होतात. बोधपर कथांमुळे चांगल्या - वाईट गोष्टींची कल्पना मुलांना दिली जायची. स्वप्नवत दुनियेत रमायला मुलांना अतिशय आवडते. लहानपणी आपण आजी - आजोबांकडून , आई - बाबांकडून गोष्टी ऐकल्या असतील. राजा - राणी , राक्षस, पंचतंत्र, विक्रम - वेताळ , ससा - कासवाची गोष्ट इ. एवढेच काय आपल्या शास्त्रात सुद्धा विविध सण - उत्सवाशी निगडित अनेक दन्तकथा पोथी - पुराणात आहेत आणि आजही त्याच गोष्टीचे दाखले दिले जातात. देवी - देवतांच्या व्रतवैकल्यात सुद्धा त्या देवतेची कथा कथन केल्याशिवाय ते व्रत सुफल संपूर्ण होत नाही.**

अर्थात मानवी जीवनात या कथाकथनाला किती महत्त्व आहे, याची जाणीव झाली असेलच. हाच धागा पकडून गेली अनेक वर्ष लेखिका, बालसाहित्यिक डॉ. सुमन नवलकर लहान मुलांसाठी लेखन करत आहेत. सोबत बालकांसाठी विविध कार्यक्रम त्यांनी यशस्वीरित्या केलेले आहेत. 'धमाल तास', 'पिट्टू पिट्टू पोपट', 'वजनदार', 'बोबडी सुटली' , 'निकालाचे पेढे' , 'गमतीचा आरसा' , 'अंगठे बहादर' , 'खरेपणाचे पाऊल', 'रोज नवी गोष्ट हवी' इत्यादि पुस्तकांच्या माध्यमातून लेखिकेने मुलांच्या भावविश्वाचा अभ्यास करून त्यांना सुयोग्य शिकवण देण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. सुमन नवलकर यांची 'मिन्नीचं घर उन्हात' ही बालकादंबरी नुकतीच प्रकाशित झाली. गोष्टींच्या माध्यमातून उलगडत जाणारी मिन्नी आणि तिच्या बालदोस्तांची ही कहाणी आहे. आपल्या रोजच्या साध्या - साध्या निरीक्षणातून, अनुभवातून तयार केलेल्या गोष्टीतून दुसऱ्याला बोधपर दिशा मिळू शकते, याचे सुरेख उदाहरण म्हणजे ही बालकादंबरी. ही जरी बालकादंबरी असली तरी मुलांसोबत त्यांच्या पालकांनी सुद्धा वाचायला हवी. जेणेकरून कथनाच्या माध्यमातून मुलांना चांगली शिकवण देता येते, त्यांच्यावर चांगले संस्कार करता येतात, हे उमगते. तृतीयपुरुषी निवेदन, सहज - सोपे संवाद आणि आशयसंपन्न रचना सोबतच १३ प्रकरणात केलेले विभाजन यामुळे कादंबरी वाचताना सहजता येते. लेखिकेच्या अंतर्मनातील निरागसता, साधेपणा या कादंबरीत उतरला आहे. मुलांची विचार करण्याची क्षमता, बौद्धिक विकास, मानसिक अवस्था, आकलनशक्ती या गोष्टींचा किती बारकाईने विचार केलेला आहे, हे जाणवते.

या कादंबरीच्या केन्द्रस्थानी आहे मिन्नी. शाळेत जाणारी हुशार विद्यार्थिनी. घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच. त्यामुळे कितीतरी गोष्टीमध्ये तिला तडजोड करावी लागते पण ती तक्रार करत नाही. एवढ्या कमी वयात मिन्नीकडे आलेला हा समजुतदारपणा तिला पुढे कसा कामी येतो, हे हळूहळू उलगडत जाते.

चंदा, वेद, सागर हे मिन्नीचे सोबती. मिन्नी आणि तिचे सवंगडी राहतात झोपडपट्टी भागात. त्यामुळे तिथे असलेल्या समस्या, उणीवा याचे चित्र कादंबरीत उभे केले आहे. या कादंबरीच्या माध्यमातून हा अत्यंत महत्वाच्या विषयावर प्रकाश टाकला आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणावर कसा परिणाम होतो, अगदी मूलभूत गोष्टीसुद्धा प्राप्त होत नाही, सोबत आजुबाजुच्या परिसरातील अस्वच्छता, पाण्यासाठी वणवण अगदी मिन्नीच्या आई - बाबांना मिन्नीसाठी चप्पल न घेता येणे, आई कामावर जाते म्हणून चंदा आपल्या छोट्या भावाला सांभाळते, इत्यादि प्रसंगातून या मुलांकडे असलेला समजुतदारपणा, लहान वयात आलेली प्रगल्भता, लहान असतानाच मोठे झाल्याची जाणीव या प्रमुख गोष्टी लेखिकेने गोष्टीच्याच माध्यमातून विशद केल्या आहेत.

आपल्या वस्तीतल्या मुलांसाठी मिन्नी बालकट्टा सुरु करते. आपल्याच वयाच्या मुलांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा प्रयत्न करणारी मिन्नी खरेच आदर्श आहे. या बालकट्टयावर मिन्नी रोज एक गोष्ट सांगते. हळूहळू इतर मुलेही कथा, कविता, कोड़ी, विनोद इत्यादि सादर करु लागतात. त्या मुलांमधील कलागुण कसे विकसित होतात, सोबतच हा बालकट्टा कसा बहरत जातो, त्याचा हा सुंदर प्रवास आहे. फक्त स्वतःपुरता विचार न करता इतरांचाही उत्कर्ष साधायचा, ज्याला जे येत नाही ते शिकवायचे, मदत करायची, असा निःस्वार्थ विचार करणारी मिन्नी खरेच कादंबरीतील जादू करणारी परीच आहे.

आपल्या गोष्टी सांगण्याच्या माध्यमातून मिन्नी आणि तिचे सवंगडी कशी विधायक कामे करतात, हे कादंबरीतून सुयोग्यरित्या मांडले आहे. आपल्या आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवणे, झाडांखाली पक्षांसाठी पाणी ठेवणं, रोज सूर्यनमस्कार घालणं, टाक़ाऊपासून टिकाऊ वस्तू बनवणं , वह्याच्या उरलेल्या पानांची एक वही बनवणं इत्यादी गोष्टी मिन्नी आपल्या सवंगड्यांना शिकवते. स्वतःसोबत इतरांनाही पुढे नेण्याचा आशादायी कार्य करते. या कादंबरीत प्रत्येक बालकट्टयावर मिन्नी जी गोष्ट सादर करते , ती वाचताना वाटते, जणू लेखिकाच गोष्ट सांगते आहे. इतके त्यात रमुन जायला होते. 'मिन्नीचं घर उन्हात' या शीर्षकातून त्या बालकांच्या परिस्थितीचं वास्तव प्रकर्षाने जाणवत राहतं. पण अशा बालकांना चांगल्या संस्कारांची सावली आपण धरायला हवी, ही महत्त्वपूर्ण बाब अधोरेखित करणारी ही बालकादंबरी आहे. ( मिन्नीचं घर उन्हात - बालकादंबरी / डॉ. सुमन नवलकर/ प्रकाशक : व्यास पब्लिकेशन हाउस / मूल्य : १६० रुपये )



# कवडसा



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**विसावलेल्या त्या निवांत वेळी खिडकीतून दिसणाऱ्या बागेतल्या झाडावर काही सुगरण चिमण्या घरटी बांधत होत्या. तसे त्यांच्या चिवचिवण्याचा आवाज दररोज येत असे, पण आज का कुणास ठाऊक? त्या... चिवचिवाटाने माझे लक्ष वेधले गेले, मी ही कुतूहलाने पाहत राहिले, स्वातंत्र्याचा मनमुराद आनंद काय असतो हे त्यांच्याकडे पाहून वाटत होते. पावसाळ्याच्या तोंडावर शेतकऱ्याची किंवा सामान्य माणसाची तयारी चालली असते, तशीच त्या चार पाच झाडांच्या दाटीत अर्धवट अवस्थेत असलेली ती चार पाच घरटी आणि इकडून तिकडून एक एक काड्या गोळा करणाऱ्या दहा पंधरा चिमण्याना पावसाळ्याची चाहूल लागली असावी का? असेच अगदी वाटत होते.**

अर्थात कल्पना शक्ती काय किंवा आणखी काय,... मनात अनेक विचार येवून गेले, तल्लीन वातावरणात चिमण्या चोचीतून काड्या काड्या जमवून घरटी बांधण्यात मग्न होत्या. आणि....

एवढ्यात आकाशात ढगांची दाटी झाली, सूर्य ही झाकोळला गेला. ढगांचा गडगडाट चालू झाला. गडगडाटामुळे असेल बहुतेक चिमण्यांना ही अंदाज आला असावा काही चिमण्या घरट्यात बसल्या काही फांद्यांच्या आड बसल्या आणि काही उडून गेल्या. ताश्याची तड तड च जणू तड तडीच्या आवाजात आकाशातून घरंगळणारे मोठमोठाले मोती च जणू... झाडे ही हलू लागली. त्यांचा बरोबर खोपा घरटी ही हिंदोळे घेऊ लागली. पाऊस येणार....! तरीही मी त्याच्याकडे बारकाईने पाहू लागले.एवढ्यात पानांची सळसळ करत करत वारा जोर जोराने वाहू लागला. ..आणि ' तेव्हाच नेमका मेघातूनी शुभ्र कवडसा हसला' दाटून आलेले मळभ दूर होऊन दूरवर विसावलेल्या सावल्यात सामावून गेले. वाऱ्यामुळे पाऊस आला नाही.उलट त्याच वाऱ्यामुळे ढग बाजूला सरकून सूर्याच्या किरणांचा सोनेरी प्रकाश झाडांच्या मधून डोकाऊ लागला. अर्थात वेळ काय किंवा येणारा तो एक क्षण काय सायंकाळची वेळ असल्यामुळे सावलीत हरवलेला तो कवडसा जीवनाचे नवे गीत लिहून गेला. झाडांच्या मधून डोकावणारा तो मंद तांबूस प्रकाश आणि त्याच झाडावरच्या चिमण्या ....किती ...कसे... कुठे...काय....कितीतरी....? खूप काही बोलका प्रसंग होता. मनात अनेक असे अनुत्तरित



प्रश्न उपस्थित करून गेला. नी मनात उमटलेल्या प्रश्नंची उत्तरेही देऊन गेला. कसे ना की ही जीवनाची शाळा असे तोंडून बाहेर पडले.

म्हणजे प्रकाशानंतर अंधार आणि अंधारानंतर प्रकाश हा येणारच ... तसे पाहता जीवनाच्या शाळेत प्रत्येक क्षणाक्षणाला एक धडा शिकायला मिळतोच. फक्त एक बघण्याचा दृष्टीकोन हवा. कधी कधी कसे होते ना, असे कित्येक प्रसंग कधी कधी जीवनाच्या शाळेत येतात काही ऐतिहासिक असतात तर काही, भौगोलिक, काही भाषिक, काही नैसर्गिक कधी बेरजेचे कधी वजाबाकीचे कधी गुणाकार होतो तर कधी भागाकार होतो.काही प्रश्न सु ट तात काही तिथेच अटकतात. कधी कौतुकाची थाप तर, कधी छड्या पण भेटतात. पण परीक्षेत पहिल्या नंबरने येण्यासाठीचा प्रयत्न माणसाने सोडू नये असे मला वाटते. मग असूदेत दररोज नवे प्रश्न प्रश्नांची उत्तर वेगवेगळी तरीही प्रश्नपत्रिका सोडविण्याचा प्रयत्न..!

नक्कीच करणार. लिहता लिहता... सहज ओठावर आलेल्या ओळी. जीवनाची हि शाळा, कधी लावते लळा. कधी रडविते बाळा,कधी मायेचा उमाळा, कधी फुलविते नात्याचा मळा.कधी सुखाचा सोहळा कधी अश्रू घळघळा, तरी लावते लळा. कधी आवडती कधी, नावडती अशी ही जीवनाची शाळा, तसे पाहता! याशाळेत प्रत्येकाचे पाठ वेगळे, प्रश्नपत्रिका वेगळी... उत्तरे वेगळी .... जे अल्प बुद्धीने सुचले ते लिहले. काही अयोग्य असेल तर मार्गदर्श नाची अभिलाशी.

# क्या 'इंडिया' जितेगा देश का भरोसा ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**नफरत की बाजार मे मोहब्बत की दुकान खोल रहा हु!" हा भरोसा देणारा विचार भारत जोडो यात्रेतून राहुल गांधी यांनी मांडला. व्हिडिओ तर सोशल मीडियातून प्रचंड व्हायरल झाला. काँग्रेसच नव्हे तर काँग्रेस सोबत असलेल्या व काँग्रेसला समर्थन करणाऱ्या अनेकांच्या स्टेटस वर झळकला. हा विचार अनेकांच्या हृदयात जाऊन बसला. काँग्रेस मध्येच नव्हे तर जनतेत एक प्रचंड विश्वास निर्माण करणारा हा विचार देशाच्या काना कोपऱ्यात भाजपच्या विरोधात एकवटल्या सारखा दिसून आला. राहुल गांधींना मोठ्या प्रमाणात समर्थन मिळू लागले. पुन्हा काँग्रेस पुनर्जीवित होईल हा आत्मविश्वासच काँग्रेस मध्ये नव्याने निर्माण झाला.**

केंद्र सरकारच्या विरोधात मशाल हाती घेणारा राहुल गांधी यांचा हा विचार आज खरच सत्तेचे राजकारण बदलण्यास मदत करेल का ? आज हुकूमशाहीचे सरकार म्हणून भाजपच्या सत्तेकडे पाहिले जात आहे. भाजप हा देशात हुकूमशाही निर्माण करत आहे. भाजप संविधानाच्या विरोधात आहे. भाजपकडून लोकशाही धोक्यात आली आहे.एनडीए चे हे सरकार देश हिताचे नाही. असे विरोधी पक्षांकडून वारंवार म्हटले जाते. भाजपाच्या विरोधात सर्वांनी एकत्रित येत संघर्ष करण्याची वेळ आलेली असल्याची आरोळी देण्यात आल्याने देशातून भाजपची सत्ता हद्दपार करण्यासाठी विरोधक एकवटलेले आहेत.आघाडीच्या माध्यमातून विरोधकांनी चांगलीच कंबर कसली आहे. विरोधकांच्या ह्याच एकीला बळकटी दिसून आली. पहिली बैठक पाटण्यात संपन्न झाली.बंगळूरु येथे संपन्न झालेल्या दुसऱ्या बैठकीतून आघाडी उदयास आली.एकूण २८ विरोधी पक्ष एकत्रित आले.महाराष्ट्रातून शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना हे दोन्ही पक्ष या आघाडीत सहभागी झाले. या दोन्ही पक्षांसह काँग्रेस,तृणमूल काँग्रेस, जेडीयु, राष्ट्रीय जनता दल, सीपीआय(एम),समाजवादी पार्टी,

इंडियन युनियन मुस्लिम लीग, सीपीआय,आम आदमी पार्टी, राष्ट्रीय लोकशाही दल,एमएमके,

एमडीएमके, व्हीसीके, केरळ काँग्रेस, आरएसपी,

केएमडीके, एआयएफबी, अपना दल, झारखंड मुक्ती मोर्चा, केरळ काँग्रेस (एम), नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी, सीपीआय(एम एल) आदी २८ पक्षांच्या आघाडीची मोट बांधण्यात आली. भाजप विरोधी आघाडी तयार केलेल्या या आघाडीचे नाव इंडीयन नॅशनल डेव्हलपमेंटल इन्कलुसिव्ह अलायन्स असे देण्यात आले. काँग्रेस सह देशातील इतर घटक पक्षांना सोबत घेऊन ही आघाडी भाजपच्या विरोधात जाऊन भाजपची सत्ता उलथवून टाकण्यासाठी विरोधकांची आघाडी पुढे आली आहे.देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत संपन्न झालेल्या तिसऱ्या बैठकीवर तर संपुर्ण देशाचेच लक्ष लागून राहिले होते. पहिल्या बैठकीपासून ते तिसऱ्या बैठकीपर्यंत जी राजकीय समीकरणाची जुळवा जुळवा होण्याचा प्रयत्न झाला.त्यास निवडणुका एकत्रितपणे लढण्यापर्यंतचा प्रवास गाठण्याची सुद्धा प्रयत्न पूर्वक जबाबदारी पेलावी लागणार आहे. फुटीरतावादाचे ग्रहण हे प्रत्येक पक्षाला आहेच. त्यामुळे पक्षा पक्षात काम करणाऱ्या नेत्याना स्व पक्षातच टिकवून ठेवण्याची किमया रुसवे फुसवे सांभाळून करावी लागणार आहे. तरच इंडिया आघाडी विश्वासाने चालेल अन देशातील जनतेला तुमच्या आघाडीवर विश्वास ठेवण्याची मानसिकता सुद्धा होऊ शकेल. राहुल गांधींनी ज्या प्रमाणे भारत जोडो यात्रेतून जो प्रतिसाद मिळविला तोच प्रतिसाद इतर घटक पक्षांना इंडिया आघाडीतून मिळवून घेणे गरजेचे आहे. यासाठी स्व पक्षाला टिकवून ठेवावे लागेल.

पक्षातील नेते मंडळी हिकडे तिकडे जाणार नाहीत किंवा स्वतःची चूल बांधणार नाहीत याकडे विशेष लक्ष तर द्यावेच लागेल. महाराष्ट्रात शिवसेना फुटलेल्या अवस्थेतील आहे. तर राष्ट्रवादी पक्षाचे सुध्दा हेच झालेले आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या कडे बघून इंडिया आघाडी वर कोण कोण विश्वास दाखवेल हे निवडणुकीच्या रिंगणात आघाडी दिसली तर मतदारांच्या मतप्रक्रियेतून दिसेल. देशातील ज्या ज्या राज्यातून राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेने प्रवास केला. तोच प्रवास जनतेच्या मनामध्ये सुख, समाधान, चेहऱ्यावर हास्य मिळवून देणारा ठरला. शेतकऱ्यांच्या बांधावर अन जनतेच्या दारात जाऊन समस्या थेट समजून घेणारा बनला.भारत जोडो या यात्रेतून भारत जोडण्याचे काम राहुल गांधींनी केलेच शिवाय भाजपच्या विरोधात सर्व विरोधकांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे सुद्धा दाखवून दिले होते. अगदी हेच शेवटपर्यंत घेऊन गेल्यास जनतेचा विश्वास ही इंडिया आघाडीवर राहू शकतो. भाजपने देशात प्रस्थापित केलेली हुकूमशाही हे जसे राजकीय विरोधी पक्षांना मान्य नाही तेच जनतेला सुद्धा मान्य नाही. भाजपची हुकूमशाही हेच इंडिया आघाडीच्या निर्मितीसाठी पोषक बनलेलं वातावरण आहे. हे वातावरण बिघडवण्यास भाजप कडून शक्कल लढवली जाईल. घराणे शाहीचा शिक्का गांधी घराण्यावर मारला जाईल. राजकारणात काँग्रेस मध्ये घराणेशाही वरून भाजपा नेहमी टीका करत आलेली आहे. येऊ घातलेल्या निवडणुकीतून सत्तेचा दरवाजा उघडण्यासाठी भाजप कायम प्रयत्न करण्यासाठी काँग्रेस वर घराणेशाहीचा ठपका ठेवून राजकारण खेळत राहील. राजकारणात घराणेशाहीचा उदय हा प्रत्येक पक्षात असतो. हे नाकारता येत नाही. परंतु जनतेच्या हिताची कामे करणारी व जनतेला सुरक्षितता मिळवून देत जनतेच्या समस्यांवर निराकरण करणारी लोकशाही अस्तित्वात असायला हवी.ती लोकशाही मात्र भाजपच्या काळात दिसलीच नाही. भाजपची सत्ता हुकुमशाही प्रमाणे सत्तेच्या केंद्रस्थानी राहत आलेली आहे. भाजपला २०१४ साली सत्ता मिळाली. आताही भाजप भोगत असलेली सत्ता जनतेच्या हिताच्या दृष्टीने नसल्याचेच एकंदरीत त्यांच्या कारभारा वरून दिसून येत आहे. महागाई,भ्र ष्टाचार,धार्मीक वाद, जातीय दंगल, हिंसाचार, बेरोजगारी, संविधानाच्या विरोधात जाऊन संविधान विरोधी कामे करणे, एकतर्फी निर्णय घेणे, एका रात्रीतच नोट बंदी करणे, खाजगीकरण करण्यावर जोर, हुकूमशहा असल्या सारखे ईडी सीबीआय या यंत्रणाना सुद्धा पक्षाचे गुलाम करण्याचे काम याच भाजप पक्षाने केलेले आहे. काँग्रेसची सत्ता असताना कधीही भीती दायक परिस्थिती वाटली नाही.परंतु आज भाजपच्या काळात माणूसच माणसापासून तोडण्याचे काम केले जात आहे. भाजपची हीच मनमानी जनता पाहत आहे. भाजपने जनतेकडून विश्वास गमावलेला असून देशात नव्याने उदयास आलेल्या इंडिया आघाडी ला सुद्धा विश्वास जनतेला देण्यासाठी



जनतेची लढाई लढावी लागेल.जनता इंडिया आघाडीवर विश्वास द्यायला बसलेलीच आहे.इंडियाला विश्वास द्यायला हवा. एकत्रित आलेल्या सर्वच पक्षांनी भाजपची हुकुमशाही मोडीत काढण्यासाठी स्वतःच्या राजकीय पोळ्या भाजत न बसता सर्वच जागे वरील उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कारण जनतेलाच भाजपा नको झालेली आहे. भाजपने सत्तेचा दुरुपयोग करून सत्तेवर जे हुकूमशाहीचे वर्चस्व निर्माण केले. ते जनतेला अजिबातच मान्य नाही. फोडा फोडीच्या राजकारणात भाजपने ज्यांच्या वर भ्रष्टाचाराचे आरोप केले ते तर त्यांच्या कडे गेल्याने वॉशिंग पावडर सारखे स्वच्छ होत आहेत.भ्रष्टाचाराच्या आरोपातून त्यांची निर्दोष मुक्तताच केली जात आहे.त्यामुळे हे भाजप सत्तेचा दुरुपयोग करून काही ही करू शकते. याची भीती जनतेला आहे. जनतेला हल्ली सुरक्षित वाटत नाही. काँग्रेसच्या काळात तरी जनतेला सुरक्षितता मिळत असल्याचा विश्वास होता.त्यामुळे आता भाजप पेक्षा काँग्रेसच बरी होती असे म्हणण्याची वेळ जनतेवर आली आहे.त्यामुळे जनता सुद्धा काँग्रेसच्या सत्तेकडे डोळे लावून बसलेली आहे की काँग्रेस पुन्हा सत्तेवर कशी येईल ?प रंतु काँग्रेस व इतर पक्षांकडून एकत्र येत जी आघाडी बनलेली आहे.त्यास संघर्ष करावाच लागणार आहे. भाजपने देशात जसे सूड बुध्दीचे राजकारण केले,ज्या हुकुमशाही प्रस्थापित करणारी ठोकशाही अंमलात आणली ते कदापि जनतेला मान्य होणारे नाही. सत्तेचा दुरुपयोग हा भाजपकडून होत आहे.पूर्वी काँग्रेसने काय केले यापेक्षाही आज देशात ज्या पद्धतीने अराजकता वाढलेली आहे.धार्मिक वाद, हिंसाचार घडत आहेत. मणिपूर सारख्या घटनेने मानवतेला काळिमा फासला. हे इतकं सर्व भयानक होऊन सुद्धा केंद्र सरकार मात्र तोंडावर बोट ठेवून गप्प बसलेली आहे.याचे मात्र दुःख जनतेला वाटत आहे.काँग्रेसवर प्रचंड नाराजीचा सूर उमटल्याने २०१४ ला युपीएच्या सरकारला ब्रेक लागून एनडीए चे सरकार आले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सुद्धा भाजपने एकहाती सत्ता हस्तगत केल्याने देशांत एनडीए चे सरकार स्थापन झाले. सलग दुसऱ्यांदा भाजपने एनडीए चे सरकार बनविले. परंतु आज याच केंद्र सरकारच्या विरोधात प्रचंड रोष करण्याची वेळ जनतेवर आली आहे. जनतेच्या विश्वासाला तडा जाणारे सरकार म्हणून भाजप कडे पाहिले जाऊ लागले आहे.आज भाजपच्या विरोधात असंतोष आहे. याचा फायदा इंडिया आघाडीला घेता यायला हवा. नव्याने उदयास आलेली ही इंडिया आघाडी नफरत की बाजार मे मोहब्बत की दुकान खरच घेऊन आलेली आहे का ? हे येत्या काळात इंडिया आघाडीची कशी भूमिका असणार आहेत यावर त्याचा परिणाम पडणार आहे. जुडेगा भारत जितेगा इंडिया हे समीकरण जुळण्यास कोणती रणनिती आघाडी नियोजन करून ठरवेल हे अधिक महत्वाचे आहे.जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी बरच काही इंडिया आघाडीच्या बाजूने आहे.इंडिया आघाडीला सकारात्मकपणे राहावे लागेल.जनतेसाठी विश्वास पूर्वक राजकारण करावे लागेल.भाजपचे राजकारण हे भेद निर्माण करणारे व विषमता वादी स्वरूपाचे आहे.भाजपमुळे देशाचे राजकारण हे गढूळ झालेले आहे.राजकीय संकृतीत विकृती आणण्याचे कटकारस्थान हे भाजपच्या राजकारणाने झालेले आहे.हे जनता ओळखते.परंतु जनतेला विश्वास देणारे राजकारण हे त्यांच्या हिताचे घडवून आणण्यासाची संधी इंडिया आघाडी मिळू शकते. सद्यस्थितीत राजकारण चमत्कारिकरित्या घडू लागले आहे.राजकीय स्फोट कधी ही करून राजकारण केले जात आहे.जनतेचा विश्वास मिळवून घेण्यासाठी राजकीय पक्ष अन त्या पक्षातील नेते खरच लायक राहिलेले आहेत का ? असा सवाल राज्यातील राजकारणातून येऊ लागला आहे. त्यामुळे भाजप तर नकोच झाली असली तरि राजकीय पक्षांवर नाराज असलेल्या लोकांचा विश्वास जिंकावा लागेल तरच जुडेगा भारत जितेगा भारत ही इंडिया आघाडीची संकल्पना जिंकण्याच्या दिशेने जाऊ शकते.

# बससेवा पूर्ववत सुरू झाल्याने नागरिक खुश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात बंद रस्ता रोको त्यामुळे बस सेवा वाहतुक ठप्प झाली होती व त्यामुळे प्रवासी नागरीक परेशान झाले होते.
येथे औरंगाबाद आगाराच्या दोन बसेस ये जा करतात तर कन्नड आगाराच्या चार बसेस दररोज कन्नड सावंगी फुलंब्री दोन दोन फेऱ्या करतात त्या मुळे कन्नड ते फुलंब्री पर्यंत ५०-६० खेड्यांतील प्रवासी नागरिक विद्यार्थी व्यापारी नौकरदार यांना याचा मोठा फायदा होतो. शुक्रवारी दोन रोजी अंतरवाली सराटी अंबड जालना येथे लाठीमार प्रकरणांमळे वातावरण चिघळल्याने निषेध बंद यामुळे दोन सर्वच वहातुक ठप्प झाली



होती.वातावरण निवळून ही बससेवा सुरळीत न होता ठप्प होती व त्यामुळे प्रवासी नागरिक विद्यार्थी व्यापारी नौकरदार नागरिक हैराण परेशान झाले आहे.तातडीने पुर्ववत बससेवा सुरू करावी जे णे करुन प्रवासी नागरिकांचा त्रास थांबेल असी मागणी प्रवासी नागरिकांकडून होती आता बससेवा पूर्ववत सुरू झाल्याने नागरिक खुश झाले आहे.

# राष्ट्रीय महामार्गावर अपघात; १० प्रवासी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यातील मलकापूर नजीकच्या राष्ट्रीय महामार्ग ६ वर झालेल्या विचित्र वाहन अपघातात १० प्रवासी जखमी झाले. यातील तीन प्रवाशांची प्रकृती गंभीर असून त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ८ सप्टेंबरला संध्याकाळी ही दुर्घटना घडली. एक काळी पिवळी जीप नांदुरा वरून मलकापूरकडे येत होती व ट्रकसुद्धा मलकापूरकडे येत होता. अचानक ट्रकच्या पुढे काही मोकाट गुरे आली. गुरांना वाचविण्याच्या प्रयत्नात ट्रक एका बाजूला झुकला. त्याच वेळी काळी पिवळी ट्रकच्या खाली दबली. आजूबाजूच्या नागरिकानी प्रवाशांना बाहेर काढत मलकापूर उपजिल्हा रुग्णाल्यात भरती केले. दहा जण जखमी झाले असून तिघांची प्रकृती गंभीर आहे.



# जीव गेला तरी बेहत्तर, आता माघार नाही

## अजय पाटील साळुंके : मराठा आरक्षणासाठी पती-पत्नी उपोषणावर ठाम

आधुनिक केसरी न्यूज




**वैजापूर :** तालुक्यातील शिऊर बंगला येथे हिंदवी जनक्रांती सेनेचे अध्यक्ष अजय पाटील साळुंके, अर्चना पाटील साळुंके यांनी मराठा समाजाला न्यायालयात टिकेल असे मनोज जरांगे पाटील यांच्या मागणी प्रमाणे आरक्षण देण्यात यावे. जरांगे पाटील यांच्या उपोषणात झालेल्या लाठीचार्ज व गोळीबार करणाऱ्या आधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात यावे.
वैजापुर तालुक्यात तसेच महाराष्ट्र कोरडा दुष्काळ जाहीर करावा. पिक विमा 100% तात्काळ जाहीर करावा. सक्तीची कर्ज वसुली थांबवा.महाराष्ट्र रोगावर हमी योजनेतील जाचक आटि शिथिल कराव्यात. आशा विविध प्रश्नांसाठी पती- पत्नीचे अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनास पाठिंबा म्हणून परीसरातील नागरिकांनी शिऊर बंगला येथे रास्ता रोको करण्यात आला होता. यावेळेस अजय साळुंके, अर्चना साळुंके, बाळा पाटील जाधव, विशाल शेळके, अनंत महाराज वाढणे, भगवान घोगरे, समाधान सुर्यवंशी, आरविंद पवार, अतुल आढाव, प्रशांत निकम, संतोष गोरे, सजन शिंदे, श्रीमंत पाटील, आदर्श साळुके साळुंके याची भाषणे झाली. यावेळी बोलतांना अजय साळुंके म्हणाले मराठा आरक्षणासाठी जिव गेला तरी बेहत्तर अता मागार नाही. मराठा आरक्षण चळवळ टिकवून आदोलनाची धग कायम ठेवा आशी भावनिक साध घालत आण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी स्वाःताची गोडी झाडून आपल्या प्रणाली आहुती दिली. काकासाहेब शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठीव जलसमाधी घेतली.यांच्यासह आनेकांनी बलिदान दिले आहेत. त्यांचे बलिदान आम्ही व्यर्थ जाऊ देणार नाहीत. मराठा समाजाचा केवळ वापर मराठाच समाजातील नेत्यांनी केला शंड आणी स्वतःच्या राजकीय पोळ्या भाजनार्या नेत्यांमुळे मराठा समाजाची ही आवस्था झाली असून जरांडे पाटलांच्या जिवाचे काही वर्षात वाईट झाल्यास राज्यात राजकीय लोकांना रसत्याने फिरणे आवघड होईल. आवळा समाज पेटून उठलेला आसतना शंड म्हणून थंड बसलेल्या राजकीय नेत्यांना समाज माफ करणार नाहीत. मतदानरुपी हत्यारातुन मराठा समाज यांची राजकीय हत्या केल्या शिवाय शांत बसणार नाहीत आशा आक्रमक शब्दात अजय पाटील यांनी संताप व्यक्त केला. या उपोषणाला परिसरातून पाठिंबा मिळत आहे. परीसरातील भजनी मंडळ रात्री उपोषण स्थळी भजन करीत आहे. शिऊर बंगला येथे सुरु असलेल्या अन्न त्याग मराठा उपोषणाचा सहावा दिवस आहे. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही तोपर्यंत आपले आंदोलन सुरूच ठेवणार असल्याची भूमिका अजय साळुंके, अर्चना साळुंके यांनी घेतली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मागणीच्या आंदोलनाची धार तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कापसात मरचे प्रमाण वाढण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात मागील



दोन ते तीन दिवसापासून काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी जास्त पाऊस पडत आहे त्यापूर्वी पावसाचा खंड पडलेला होता अशा भिन्न परिस्थितीत काही ठिकाणी बीटी कापूस पिकावर आकस्मिक मर आल्याचे चित्र समोर येत आहे अशा वेळी शेतकऱ्यांनी खालील प्रमाणे उपाय योजना करावी. १०० लिटर पाण्यात युरिया 1.५ किलो अधिक म्युरेट ऑफ पोटेश 1.५ किलो अधिक कॉपर ऑक्सिक्लोराईड २५० ग्रॅम घेऊन झाडाच्या बुंध्याजवळ 100 ते १५० मिली आळवणी करावी व दोन पायातील बोटात झाड धरून झाडाचा बुन्धा शेजारील माती दाबुन घ्यावी तसेच या सोबत साचलेले पाणी प्रथम शेताबाहेर काढावे समस्या दूर करावी... किंवा ट्रायकोडर्मा / बियोमिक्स या बुरशीनाशकाची २०० मिली प्रती दहा लिटर पाण्यातून आळवणी करावी अशा प्रकारे शेतकऱ्यांनी फवारणी केल्यास आकस्मिक मर या रोगाचे प्रमाण कमी होऊन जाईल अशी माहिती सोयगाव कृषी विभागाच्या वतीने कृषी सहाय्यक मानसिंग भोळे यांनी बोलताना सांगितले.

अधिक माहितीसाठी डॉ. एस. बी. पवार सर, विस्तार कृषी विद्यावेत्ता, विभागीय कृषी विस्तार शिक्षण केंद्र, औरंगाबाद, डॉ. दिलीप हिंगोले, सहयोगी प्राध्यापक व नस्पती रोग शास्त्र राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधावा.



# आरक्षण आंदोलनाचे पडसाद चंद्रपुरातही

## रितेश टोंगे यांचे आजपासून अन्नत्याग आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊ नये, बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकाने जातनिहाय सर्वेक्षण लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, ओबीसी विध्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात दोन वसतिगृह सुरू करण्यात यावे, ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याची शिफारस केंद्र शासनाकडे करावी व स्वाधार योजना लागू करण्यात यावी या संविधानिक मागण्या घेऊन रविंद टोंगे जिल्हाध्यक्ष, राष्ट्रीय ओबीसी विद्यार्थी महासंघ यांनी जिल्हाधिकार कार्यालय समोर चंद्रपूर, येथे दुपारी 12 वाजता पासून अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे.

या अन्नत्याग आंदोलनाची सुरवात राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, सचिन राजूरकर, ॲड. पुरूषोत्तम सातपुते, कुणबी समाज अध्यक्ष, माळी महासंघ प्रदेशाध्यक्ष वैद्यकीय आघाडी, विदर्भ तेली समाजाचे अध्यक्ष प्रा सूर्यकांत खनके, दिनेश चोखारे, सतीश भिवगडे, आकाश साखरकर, राजेंद्र खांडेकर, शाम लेडे, अरुण तीखे माळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष, गणेश आवारी, हितेश लोडे, रणजित डावरे अक्षय येरगुडे, मनीषा बोबडे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. जालन्यातील जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी समाजाच्या प्रमाणपत्राची केलेली मागणी चुकीची असुन त्यांच्या या मागणीला. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचा विरोध आहे. ५२ % ओबीसींना ५२ % आरक्षण देण्यात यावे व सर्वोच्च न्यायालयाने लादलेली ५० % आरक्षणाची अट रद्द करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करावी या व अशा मागण्यांसाठी हे अन्नत्याग आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

# कायदा हातात घेण्याऱ्यांची गय केली जाणार नाही : ठाकूरवाड

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** सध्या पोळा गणपती उत्सव काही दिवसावर येऊन ठेपला आहे. त्या संदर्भात मक्रणपुर कन्नड येथे शांतता बैठक घेण्यात आली या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड बोलताना म्हणाले धार्मीक उत्साहामध्ये जर कोन्ही कायदा सुव्यवस्थाची पायमल्ली करून जर कोन्ही कायदा हातात घेत असेल तर त्याची गय केली जाणार नाही. यावेळी पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर बोलताना म्हणाले 2015 पासुन मक्रणपूर गाव हे शांततेत होते मात्र 2021 पासून गावातून विविध प्रकारच्या तक्रारी कन्नड शहर पोलीस ठाण्यात दाखल झाल्या आहेत. आमची ही करडी नजर आहे. आम्ही पोलीस डायरी चेक केली आहे. आमचे गावातील प्रत्येकावर बारकाईने लक्ष लागले आहे. जर कोन्ही पोळा व गणेश उत्साहात गरबड केली तर त्याची गय केली जाणार नाही असे शांतता बैठकीत बोलताना म्हणाले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर, साहयक पोलीस निरीक्षक सचिन खटके, एस.एल. सुलाने, दिनेश खेडकर, सलीम शहा तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# वायुप्रदूषणाच्या जनजागृतीसाठी सायकल रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी उपक्रम असलेल्या राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत वायुप्रदूषणाच्या दुष्परिणामांबाबत नागरीकांमध्ये जागृती निर्माण होण्यासाठी आणि त्यादृष्टीने कृती करण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे दुचाकी इलेकट्रीक वाहन,सायकल रॅली व पथनाट्य कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार ७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता मनपा पार्कींग स्थळ येथे करण्यात आले होते.

'निळ्या आकाशासाठी स्वच्छ हवा' (क्लीन एअर फॉर ब्लू स्काय) दिनानिमित्त आयोजीत या रॅलीत जवळपास २०० सायकलस्वार व शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शहरातील गांधी चौक ते जटपुरा गेट ते मनपा कार्यालय या मार्गावर सायकल चालवत स्वच्छ पर्यावरणाचा संदेश दिला.दरवर्षी ७ सप्टेंबर रोजी इंटरनॅशनल डे ऑफ क्लीन एअर फॉर ब्ल्यू स्काय दिवस साजरा करण्यात येतो. याप्रसंगी मार्गदर्शन करताना आयुक्त विपीन पालीवाल म्हणाले की, राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत मनपातर्फे वृक्षारोपण, हिरवळ वाढविणे, पर्यावरणपुरक साधनांचा वापर करणे इत्यादी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. शहरातील प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने जे काही उपक्रम राबविण्याचे असतील ते सर्व मानपमार्फत राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगीतले. आयुक्त यांच्या हस्ते रॅलीस हिरवी झेंडी दाखवून सुरवात करण्यात आली. यावेळी भवानजीभाई चव्हाण हायस्कुल, छोटुभाई पटेल हायस्कुल, जगन्नाथ बाबा विद्यालय, न्यू इंग्लीश हायस्कुल शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. मनपा आयुक्त व उपायुक्त यांनी देखील सायकल चालवुन पर्यावरण वाचविण्याचा संदेश दिला. पर्यावरणाचे महत्व अधोरेखीत करणारे पथनाट्य याप्रसंगी सादर करण्यात आले व रॅलीत सहभाग नोंदविल्याबद्दल जेष्ठ नागरीक, विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले, मुख्यलेखाधिकारी मनोहर बागडे, शहर अभियंता महेश बारई तसेच अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.






# तलवारबाजीत संत जनार्दन माध्यमिक विद्यालयाच्या वेदांत सराफची बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** सेलू येथील नूतन विद्यालयात क्रीडा संचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत चारठाणा येथील संत जनार्धन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १२विज्ञान वर्गातील वेदांत सराफ या विद्यार्थ्यांने १९वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक पटकावून विभाग स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जिल्हा योगासन सचिव डी.डी. सोन्नेकर, तालुका क्रीडा संयोजक गणेश माळवे, प्रशांत नाईक, दिपक कुलकर्णी, प्रशिक्षक संजय भुमकर, तुलाही खुदूस यांची उपस्थिती होती. या यशाबद्दल संस्था अध्यक्ष मुकुंद चव्हाण सचिव नामदेव चव्हाण मुख्याध्यापक श्री एस आर महाजन, क्रीडा विभाग प्रमुख आर एस राठोड व सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# शिरपूरच्या जवानाला लेहमध्ये वीरमरण

आधुनिक केसरी न्यूज



**वाशीम :** शिरपूर येथील जवान आकाश अढागळे यांना लेहमध्ये वीरमरण आले. कर्तव्यावर असताना उंच पहाडावरून पडल्याने ते गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान १० सप्टेंबर रोजी त्यांची प्राणज्योत मावळली. जवान आकाश अढागळे भारतीय सैन्यात बारा वर्षापूर्वी दाखल झाले होते. आकाश गरीब कुटुंबातील होते. मोठ्या कष्टातून ते भारतीय सैन्यात दाखल झाले. लेह येथे सेवा बजावत असताना उंच पहाडावरून पडल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. १० सप्टेंबर रोजी त्यांना वीरमरण आले. काही वर्षापूर्वीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. आता घरातील तरुण मुलगा गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ व चार वर्षाची मुलगी आहे. त्यांचे पार्थिव आज मंगळवारी आणण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

# अजिंठा लेणी परिसरातील पाझर तलाव ओव्हरफ्लो

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील अजिंठा लेणी व फर्दापूर परिसरात सलग तीन ते चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने वाघूर नदीसह परिसरातील सर्वच लहान मोठ्या नदीनाले व ओढ्यांना पूर आला. बुधवारपर्यंत कोरडेठाक असलेले पाझर तलाव ओव्हरफ्लो होऊन ओसंडून वाहायला लागले आहे. सलग तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने परिसरातील संपूर्ण चित्रच बदलून टाकल्याचे दिसत असून भविष्यात पाणीटंचाईचे संकट पूर्णपणे मावळल्याचे दिसत आहे. मागील तीन महिन्यांत सावळदबारा,फर्दापूर व अजिंठा लेणी परिसरात एकही दमदार पाऊस झाला नाही. त्यातच अधूनमधून पडणाऱ्या रिमझिम पावसाने ही जवळपास एक ते दिड महिना दडी मारल्याने या परिसरातील मुख्य जीवनदायीनी असलेल्या वाघूर नदी सह सर्व लहान मोठे नदी, नाले, ओढ्यांचे प्रवाह खंडित होऊन परिसरातील सर्वच पाझर व सिंचन तलाव कोरडे ठाक असल्याचे दिसत होते. परिणामी या परिसरात दिवाळी पूर्वीच पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता होती दरम्यान,परिसरात पावसाचे जोरदार आगमन झाले. या पावसाने गुरुवारी पहाटे व सायंकाळी पुन्हा एकदा फर्दापूर व अजिंठा लेणी परिसराला झोडपून काढले. शुक्रवारी दिवसभर संततधार स्वरुपात सुरू असलेल्या पावसाने शुक्रवारी संध्याकाळी अचानक पवित्रा बदलून हा पाऊस जवळपास दोन तास जोरदारपणे कोसळला त्यानंतर शुक्रवारी रात्रभर संततधार पाऊस सुरूच असल्याने येथील वाघूर नदीसह सर्वच लहान मोठे नदी, नाले ब ओढाण्यांना पूर आला तर अजिंठा लेणी टी पॉइंट येथील पाझर तलाव ओव्हरफ्लो होऊन तलावाच्या सांडव्यातून पाणी ओसंडून वाहायला लागले.परिसरातील जवळपास सगळेच पाझर तलाव शंभर टक्के भरल्याने भूजल पातळीत चांगली वाढ झाली. भविष्यात या भागातील अनेक गावांत भेडसावू पाहणारी पाणीटंचाई सध्यातरी टळल्याचे दिसत आहे.या पाऊसामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे.



# अंबादास दानवेंनी साधला कार्यकर्त्यांशी संवाद

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते नामदार अंबादास दानवे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी सिल्लोड येथे पक्षाच्या कार्यकर्त्यांची संवाद साधून कार्यकर्ते पदाधिकारी यांच्याकडून आढावा घेतला तत्पूर्वी शिवसेना तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे उपजिल्हाप्रमुख सुदर्शन अग्रवाल यांनी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचा पक्षाच्या संपर्क कार्यालयात शाल पुष्पहार देऊन सत्कार केला त्यावेळी कार्यकर्त्यांची संवाद साधताना गावनिहाय सर्कलनिहाय व भूतनिहाय आढावा जाणून घेतला त्यावेळी कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी आपापल्या परीने विरोधी पक्ष नेत्याला पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी आम्ही गाव पातळी पासून संपूर्ण विधानसभा मतदारसंघात कटिबद्ध आहोत, असे कार्यकर्त्यांनी विरोधी पक्ष नेत्याला आश्वासन देऊन तालुक्यामध्ये अधिका अधिक पक्षाचा कार्यकर्ता कसा वाढवता येईल या मी प्रयत्न करीत आहोत. त्यावेळी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे म्हणाले की, 2024 च्या लोक सभेच्या व विधानसभेच्या निवडणुकात भाजपाचे पूर्णपणे पानिपत होणार असून उद्धवसाहेब पुन्हा मुख्यमंत्री होतील यात तीळ मात्र शंका नाही त्यासाठी तुम्हाला काम करणे गरजेचे आहे अशी या धावती भेटीमध्ये अंबादास दानवे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले त्यावेळी कार्यकर्त्यांनी असा आग्रह धरका की,दादा तुम्हीउ सिल्लोड सोयगाव विधान सभा निवडणूक लढवा. त्यावेळी अंबादास दानवे म्हणाले की, तुम्ही पक्षाची गाव तेथे बांधणी करुन शाखा स्थापन अरुन संघटन मजबूत करा असे सांगितले. त्याचबरोबर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा पिण्याच्या पाण्याची भीषण दाहकता हे लक्षात घेऊन तालुका प्रशासनाने सुद्धा या शेतकऱ्याचे नुकसान झाले त्यांनाही नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी असे रघुनाथ घरमोडे यांच्या संपर्क कार्यालयामध्ये सांगितले त्यावेळी उपजिल्हाप्रमुख सुदर्शन अग्रवाल तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे शिवसेनेचे नेते विठ्ठल बदर, रघुनाथ चव्हाण, भास्कर आहेर, उपतालुकाप्रमुख शिवा गौर, रामेश्वर काळे, नारायण आहेर, सोमिनाथ बडक, युवासेना जिल्हधिकारी कैलास जाधव युवासेना तालुकाधिकरी अमोल शिंदे शहरप्रमुख मच्छिंद्र धाडगे ,विभागप्रमुख गजानन जैस्वाल, प्रशांत जाधव, रामेश्वर जंजाळ सुनिल अंभोरे, मनोज अग्रवाल, समाधान फरकाडे, उपशहरप्रमुख रवी रासने, सचिन पाटील, सखाराम दुधे, किसान सेना तालुकासंघटक सखाराम हिवाळे, राऊबा लोखंडे, अंकुश ढोके, दिनेश तांबे, तात्याराव पालोदकर , सुभाष वडगांवकर, काशीनाथ इंधाटे, शिवाजी शिंदे, गोरख शिंदे, दादाराव पंडीत, जगनाथ कळम, रावसाहेब गोराडे, तुकाराम खळतकर, सचिन रुद्रे, कैलास मोरे, कैलास इंगे, भिकनराव डिडोरे, तात्याराव दिवटे, डॉ. राजू वरपे, भाऊसाहेब थोरात, धोडीराम गाडेकर, गजानन गाडेकर, एकनाथ गाडेकर, कृष्णा सरोदे, विलास सोनवणे, गजानन शिंदे, विजय चव्हाण, हिमतराव पुगळे, विठ्ठल खिल्लारे, शंकरराव रोठे, गणेश पवार, विठ्ठल ठोले, सोमिनाथ सुरडकर, राजु सिरसाठ शहरातील व तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने विविध मागण्यांसाठी मंत्रिमंडळ बैठकीवर मोर्चा

## प्रा. रामचंद्र भरांडे : मोर्चात मोठ्या संख्येने हजर रहा

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने विविध मागण्यांसाठी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीवर शनिवार, दि. 16 सप्टेंबर रोजी दुपारी 12 वाजता एल्गार मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष नामदेव गायकवाड यांनी दिली आहे. लोकस्वराज्य आंदोलनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे हे मोर्चाचे नेतृत्व करणार आहेत. मोर्चामध्ये मातंग समाजातील कामगार, महिला, युवक, रिक्षाचालक, हमाल माथाडी कामगार यांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे. सदर मोर्चास क्रांतीचौक येथील छत्रपती शिवामी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सुरूवात होईल.

संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करा, अनुसूचित जाती आरक्षणाचे अबकड वर्गीकरण करा, जातीयवादी मानसिकेतून दलितांवरील वाढत्या अन्याय अत्याचारांना पायबंद घाला, मातंग समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना उद्योग व्यवसायासाठी विनातारण 10 लाखांचे कर्ज वाटप करा, अण्णा भाऊ साठे महामंडळाचे भाग भांडवल वाढवा आदी मागण्या घेऊन हा मोर्चा मंत्रिमंडळ बैठकीवर धडकणार आहे. या मोर्चात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष नामदेव गायकवाड, प्रदेश सचिव ॲड. नितीन पोळ, प्रा. पी.डी. गोणारकर, रावसाहेब दादा पवार, प्रा.बी.आर. पारस्कर, व्ही.जी.डोईवाड, दशरथ् मानवतकर, जिल्हाध्यक्ष अतुल खंडगावकर, ॲड. सचिन बोईवार, गणेश तुपे, नागेंद्र वाघमारे, नागेश पवार आदींनी केले आहे.

# काम तो बहुत आया, मगर खिसा अभी भी खाली है : कामगार नेते गुलाबराव जगताप

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** लोखंड उद्योग आला,पण अद्याप ८०% तोटा कंपनीने भरून काढला असला तरी अजूनही २०% तोटा कंपनी भरून काढू शकली नाही. पण येणाऱ्या वर्षात कंपनी निश्चित माथाडी कामगारांच्या मदतीने ८० टक्के फरक भरून काढेल.त्यामुळे कंपनी प्रशासन व माथाडी कामगार संघटना यांनी एकत्र येऊन सकारात्मक चर्चा करावी.जेणेकरून कामगारांच्या पदरात अधिकाधिक पडले पाहिजे कारण, १००% अन्याय कधीच दूर होणार नाही,कारण कामगार चळवळीच्या अडचणी कधीच संपत नाहीत.कुठलेच प्रश्न १००% सुटत नसतात,जरी सुटले तरी नवीन प्रश्न तयार होत असतात.हे माथाडी कामगारांनी लक्षात ठेवून काम करावे.

दरवर्षी प्रमाणे महाराष्ट्र राज्य माथाडी,ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या खंबीर नेतृत्वात समस्त नवी टोळी गट नंबर ए १ ते १६ तर्फे श्री. काशीखंड ग्रंथ सांगता निमित्त श्री. सत्यनारायणाची महापूजा दिनांक ९ सप्टेंबर २०२३ रोजी टाटा यार्ड कळंबोली येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली होती.यावेळी माथाडी कामगारांना महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे कार्याध्यक्ष तथा हिंदुस्तान



बँकेच्या प्रगतीचे शिल्पकार अध्यक्ष गुलाबराव जगताप यांनी मार्गदर्शन केले.यावेळी विविध उपस्थित मान्यवरांना हार,शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

गुलाबराव जगताप म्हणाले की, डार्सल कंपनीने गेल्या वर्षी कळंबोली टाटा लोखंड यार्डात सुरुवात कामाची सुरुवात केली. त्याबद्दल सी. जे. डार्सल जी.एम. सूर्यनारायण सिंग यांना मनापासून धन्यवाद देतो. गेली अनेक वर्षे कळंबोली स्टील मार्केटमध्ये लोखंड येईल की नाही?मोठे स्वप्न होते,कारण माथाडी कामगारांची इच्छा आहे, की येथे लोखंड आलंच पाहिजे.त्यासाठी काय करावे लागेल ते करा,असं सूर्यनारायण सिंग यांना सांगितले.तेव्हा त्यांनी सांगितले की मला माथाडी कामगारांच्या वतीने आपल्या युनियनचे पत्र द्या. मी ताबडतोब कोणालाही न विचारता, कंपनीला पत्र दिले.या कामगारांची संपूर्ण जबाबदारी ही माथाडी संघटनेची आहे.या पत्राच्या आधारे डार्सल कंपनाच्या माध्यमातून लोखंडाचे काम उपलब्ध झाले, त्यासाठी सी. जे. डार्सल जी.एम. सूर्यनारायण सिंग यांची मदत झाली. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात माने यांनी मनोगत व्यक्त करताना माथाडी कामगारांच्या वतीने विविध विषयांवर प्रकाश टाकला. यावेळी सी.जे.डार्सल कंपनी जी.एम. सूर्यनारायण सिंग, कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील,हिंदुस्तान बँकेचे संचालक व माजी अध्यक्ष प्रकाश नार्वेकर, सी.जे. डार्सल कंपनी डी.जी. एम. रुपेन पत्रावाला,महानगर गॅस कंपनीचे अधिकारी श्री.वर्मा,पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालविकास मा. सभापती मोनिकाताई महानवर,जीएसटी अधिकारी प्रकाश महानवर, शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे,गोपाळ भगत, हिंदुस्तान बँकेचे संचालक सुरेश येळे, बाळासाहेब मराठे, भीमराव जाधव, अभ्युदय बँक कळंबोली शाखेचे व्यवस्थापक पानसरे, माथाडी पतपेढीचे व्यवस्थापक माथाडी युनियन व सेक्रेटरी संजय चोरमले, समस्त नवी टोळी ए १ ते १६ , ज्येष्ठ सभासद व सर्व खंबीर कार्यकर्ते तसेच माथाडी कामगारांच्या संदर्भातील सर्व संबंधित आस्थापना,विविध कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच माथाडी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील कसबा विभागातील श्री गणपती मंदिर संस्थान सभागृहात आज सकाळी १०ते१२या वेळात येथील समस्त नाभिक समाज बांधवाच्या वतीने श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथीनिमित्त युवा कीर्तनकार ह.भ.प योगेश महाराज वारे यांचे कीर्तनानंतर दुपारी १२वा.सेना महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहुन व गुलाल उधळून पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी येथील माजी जि.प. सदस्य परभणी मिनाताई नानासाहेब राऊत, सरपंच अनिरुद्ध चव्हाण, शिवसेना नेते अक्षदा राजेश चक्कर, ईद्रंजीत घाटुळ, शाहीर भारत मुंजे, पंजाबराव महाराज काळे, मृदुंगाचार्य दता महाराज उगले, विश्वनाथ काळे, ज्ञानेश्वर कटारे, विठ्ठल चव्हाण, विशाल देशमुख, बसुअप्पा तमशेटे, निवृती तुरे, संतोष काळे,डिंगाबर लोखंडे, अशोक खाडे, देवीदास देशमुख, देशमुख, पंढरीनाथ खाडे, भारत खाडे, मुकुंद खाडे, कृष्णा सोनटक्के, गणेश खाडे, गोविंद खाडे, बाळु खाडे, काशिनाथ खाडे, केशव खाडे, आंबादास खाडे, गणेश खाडे, अमोल खाडे, शकंर खाडे, अशोक खाडे, दिपक भाग्यवंत, ऊदय लोखंडे यांच्यासह येथील संत सावता महाराज भजनी मंडळ,गोकुळेश्वर महादेव मंदिर भजनी मंडळ, बसवेश्वर महाराज भजनी मंडळ, मारोती मंदिर भजनी, संत सेना महाराज मित्र मंडळी यांच्यासह येथील सर्व भजनी मंडळी व भाविक भक्त व समस्त नाभिक समाज चारठाणा ऊपस्थीत होता. हा सर्व कार्यक्रम आयोजित व यशस्वी करण्यासाठी समस्त नाभिक समाज व गावकरी मंडळींनी परिश्रम घेतले आहेत.

# बाप्पांसाठी स्वत:चा सण ढकलला एक दिवस पुढे

## मुस्लिम बांधवांनी सामाजिक सलोखा राखण्यासाठी घेतला निर्णय

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** अनंत चतुर्दशी आणि ईद-ए-मिलाद हे उत्सव एकाच दिवशी येत आहे. या पार्श्वभूमीवर ईद-ए-मिलाद ची मिरवणूक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील इतर ठिकाणी 29 सप्टेंबर, तर धुळे शहरात 30 सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय घेऊन मुस्लिम बांधवांनी सामाजिक एकात्मता जोपासण्याचा संदेश दिला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ईद-ए-मिलादच्या मिरवणूकीच्या संदर्भात आढावा बैठक जिल्हा नियोजन सभागृह येथे संपन्न झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावर्षी गुरुवार, 28 सप्टेंबर, 2023 रोजी अनंत चतुर्दशी तसेच ईद-ए-मिलाद हे सण एकाच दिवशी येत असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी अनंत चतुर्थीच्या दिवशीऐवजी ईद-ए-मिलादची मिरवणूक एक किंवा दोन दिवसांनी काढण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाच्यावतीने सिरत कमिटी सदस्य तसेच बैठकीस उपस्थित मुस्लीम बांधवांना करण्यात आली. याबाबत उपस्थित मुस्लीम बांधवांनी प्रशासनाशी चर्चा करुन चर्चेअंती धुळे शहरातील ईद- ए- मिलादची मिरवणुक शनिवार 30 सप्टेंबर, 2023 रोजी काढण्यात येईल. व त्याव्यतिरीक्त जिल्ह्यातील इतर ठिकाणी निघणाऱ्या मिरवणुका शुक्रवार 29 सप्टेंबर, 2023 रोजी काढण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. तसेच मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी मिरवणुकांमध्ये मोठ्या काठयांचे झेंडे फिरविले जाणार नाही, काही अक्षेपार्ह घोषणाबाजी अगर हावभाव, आरडाओरड करण्यात येणार नाही. याबाबत काळजी घेवून येणारे सण, उत्सव शांततेने साजरे करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा पोलीस अधिक्षक संजय बारकुंड यांनी यावेळी केले आहे.

या बैठकीस सर्व तहसिलदार, मुख्याधिकारी तसेच पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्ह्यातील सिरत कमिटीचे सदस्य, मुस्लिम धर्मगुरु, मौलाना, मुस्लिम समाजाचे प्रतिष्ठीत नागरीक, नगरसेवक, माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, शांतता कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# वाघिणीच्या हल्ल्यात महिला ठार

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** शेतात गेलेल्या महिलेवर वाघाने



हल्ला करून ठार केल्याची घटना देसाईगंज तालुक्यातील फरी-झरी जंगल परिसरात सकाळी १० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. महानंदा दिनेश मोहूर्ले (५३, रा.फरी) असे मृत महिलेचे नाव आहे. हल्ला करणारी वाघीण टी १४ असल्याची शक्यता वन विभागाने वर्तविली आहे. मृत महिला सकाळी ९ वाजताच्या सुमारास फरी-झरी जंगल परिसराला लागून असलेल्या आपल्या शेतात गवत काढायला गेलेली होती. दरम्यान, झुडुपात दबा धरून बसलेल्या वाघाने महिलेवर हल्ला करून जंगलाच्या दिशेने फरफटत नेले. यावेळी जवळपास असलेल्या नागरिकांनी धाव घेतली असता वाघ जंगलात पळून गेला. मात्र, तोपर्यंत महानंदा मोहुर्ले यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविला. पिडीत कुटुंबाला तत्काळ नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याचे वनाधिकाऱ्यांनी कळविले आहे. हा हल्ला टी १४ वाघिणीने केला असल्याची शक्यता देसाईगंज वनविभागाचे उपवनसंरक्षक सालविठ्ठल यांनी वर्तविली आहे. मधल्या काळात वाघांचे हल्ले कमी झाले होते.



# आमदार निधीतून उभारलेल्या धार्मिक स्थळांचे लोकार्पण व भूमिपूजन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** कार्यसम्राट आमदार प्रा.रमेश पा. बोरनारे यांच्या ३०लक्ष खर्चून आमदार निधीतून निवारा नगरीत उभारलेल्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्र व ३०लक्ष खर्चून उभारलेल्या श्री गणेश मंदिरचा लोकार्पण सोहळा व याच परिसरात २०लक्ष निधीतून उभे राहणारे भगवान शंकराचे महादेव मंदिर भूमिपूजन सोहळा रविवार (ता.१०) रोजी मोठ्या उत्साहात व आनंदात संपन्न झाला.

ही तिन्ही धार्मिक स्थळ या परिसरातील रहिवासी यांच्या जीवनात सुख, शांती समृद्धी प्रदान करतील असे आ. बोरनारे म्हणाले. या प्रसंगी पिठावर माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, साबेरखान, औरंगाबाद च्या केंद्रप्रमुख राजयोगिनी ब्रह्माकुमारी शीलादीदी, कमलदीदी, डॉ.व्ही. जी. शिंदे, शिवसेना प्रमुख राजेंद्र पा. साळुंके, शहर प्रमुख पारस घाटे, सौ.आमदार संगीता बोरनारे, बाबासाहेब जगताप, श्रीमती राऊत, डॉ. प्रीतीभोपळे, मुमताज बी सौदागर, प्रमोद कुलकर्णी, सुरेंद्र सुतवणे, अमोल बोरनारे, संजय बोरनारे,रणजित चौहान, दशरथ बनकर, ज्ञानेश्वर माऊली टेके, स्वप्निलजेजुरकर, धोंडीरामसिंह राजपूत, डॉ. निलेश भाटिया, शंकर मुळे, कमलेश आंबेकर, इम्रान कुरेशी, खलील मिस्तरी यांच्या सह या परिसरातिल महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्र संचलन धोंडीराम ठाकूर यांनी केले आभार बाबासाहेब जगताप यांनी मानले.

# अवैधरित्या कट्टा बाळगणारा ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस निरीक्षक श्री हेमंत पाटील, स्थागुनाभा, धुळे यांना इसम करण जगन शिंदे, वय 26 वर्ष, य. पातलनगरी, निजामपुर वा. साक्री, धुळे हा परिसरात दहशत पसरविण्या उद्देशाने स्वतःच्या कब्जात अवैध्यरित्या भावठी कट्टा बाळगुन असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने करण शिंदे याच्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकास आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने करण जगन शिंदे याचा शोध घेत असताना स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकास तो निजामपुर बस स्टैंड परिसरात मिळुन आल्याने त्याची पंचासमा अगझडती घेता गावठी कट्टा जिवंत काडतुस मिळुन आले आहे.

1) 40,000/- रु. कि चे एक गावठी बनावटीचे पिस्टल (गावठी कट्टा) स्टील बॉडी व मॅगझीन असलेला, त्यास काळ्या रंगाची मुठ असलेला कि. अ. 2) 1000/- रु. कि ये एक काडतुस असा एकुन 41000/- किंमतीचा गावठी कट्टा व जिवंत काडतुस करण जगन शिंदे, वय 26 वर्ष, रा. पातलनगरी, निजामपुर, ता. साकी, धुळे यांचे ताब्यातून जप्त करण्यात आले असुन त्याचे विरुद्ध निजामपुर पोलीस स्टेशन येथे गुणवंतराव अशोकराव पाटील, नेमणुक स्थागुशा, धुळे यांचे फिर्यादिवरुन भारतीय हत्यार कायथा कलम 3/25 अन्वये गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक संजय बारकुंड साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री किशोर काळे साहेब यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थागुअशा धुळेचे पोलीस निरीक्षक श्री हेमंत पाटील, योगेश राऊत, मच्छींद्र पाटील, निलेश पोतदार, सुशील शेंडे, गुणवंतराव पाटील अशांनी केली



# मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत मतदानावर नादरपूरकरांचा बहिष्कार

## विकासकामाचा आराखडा घेत व्हिडीओ शूटिंगच्या निगराणीत घेण्यात आली ग्रामसभा

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** ग्रामपंचायत कार्यलय नादरपूर, ता.कन्नड जि. औरंगाबाद येथे विशेष ग्रामसभेचे आयोजन भगवान नामदेव निकम यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने मराठा समाजास आरक्षण मिळेपर्यंत मतदानावर बहिष्कार टाकणे या विषयावर चर्चा कारण्यात आली. तसेच मराठा समाज शेतकरी असल्याने मराठा समाज हा आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या दुर्बल झालेला आहे. शेतकरी असुन शेती व्यवसाय करणारे आहे. मराठा समाजाचे मुलं-मुली हे गुणवंत असून सुद्धा आरक्षण नसल्यामुळे शिक्षण,नोकरी,व्यापार यापासून वंचित राहत आहे. यावर प्रामुख्याने ग्रामसभेत सर्वानुमते चर्चा होऊन सदर ठराव पारीत कारण्यांत आले व सदर ठराव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्याचे ठरले तसेच मराठा समाजा करीता चालू असलेल्या आंदोलनास ग्रामसभेत सर्वानुमते जाहीर पाठिंबा देण्यात आला. शेवटी लक्ष्मण बळी यांनी उपस्थित ग्रामस्थांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले. तसेच या अगोदर ही ग्रामसभेचे आयोजन मा. सरपंच यांचे उपस्थितीत श्री ज्ञानेश्वर तुकाराम निकम यांचे अध्यक्षतेखाली मारोती मंदिर सभागृह येथे.व्हिडीओ शूटिंग द्वारे घेण्यात आली. ग्रामसभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015 च्या प्रसिद्धी बाबत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती उपक्रम कार्यक्रमाबाबत (एक गाव एक उद्योजक) बालविवाह मुक्त ग्रामपंचायत करणे बाबत. ओ डी एफ प्लस ग्राम पंचायत कारण. हर घर जल योजनेचे सविस्तर वाचन. ग्राम पंचायत मार्फत वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करणे. करवसुलीसाठी करवसुली मोहीम राबविणे.



प्लास्टिक बंदी बाबत जागृती करून प्रभावी मोहीम राबविणे. स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापन करणे बाबत. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी टोजना सन-2024-25 लेबर बजेट व कृती आराखड्यात तयार करून त्यास मान्यता देणे. अनुसूचित व नवबौद्ध घटक वस्तीचा विकास योजना पंचवार्षिक आराखडा तयार करणे. प्रधानमंत्री,रमाई आवास योजना अंतर्गत मंजूर घरकुल बांधकामाबाबत.

13 )समाजकल्याण विभाग अंतर्गत घरकुलसाठी दिव्यांग लाभार्थ्यांची निवड करणे बाबत 14 ) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत स्मशानभूमी परिसर सुशोभीकरण करणे बाबत.

15 )ऐन वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

वरील प्रमाणे विषयावर चर्चा करण्यांत आली व त्यावर चर्चा करण्यात येऊन ठरावास मान्यता घेण्यांत आली. ग्रामसभेस सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, कार्यकारी मंडळ, शालेय समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष, सदस्य, तंटा मुक्ती समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, तलाठी आप्पा, पोलीस पाटील, सोसायटी व्हा. चेअरमन, माजी सरपंच, ग्राम पंचायत कर्मचारी, रोजगार सेवक व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. शेवटी तलाठी आप्पा यांनी आतापर्यंत उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांचा व ग्रामसेवक, मा.अध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीयुत लक्ष्मण बळी यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# रुई येथे तब्बल ३१ वर्षांनी माजी विद्यार्थी, शिक्षक स्नेहमेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** गेट टुगेदरचा लागला ध्यास मनात येती क्षण ते खास आठवते अजुनी ते बालपण अल्लड अवखळ नादान यौवन खाकी हाप पँट अन् हापच शर्ट डोक्यावर टोपी दिसायची स्मार्ट पायात नव्हते पायताण, अशा काहीशा आठवणी मनात ठेवून, शाळेतील धमाल, मित्रांसह केलेला दंगा या आठवणीतून बाहेर पडून माध्यमिक शाळेत शिक्षण घेऊन बाहेर नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी वय, नोकरीचे क्षेत्र, धकाधकीचे जीवन या सगळ्याच सीमा ओलांडत स्नेह मेळाव्याला हजेरी लावत आपल्या ३१ वर्षांपूर्वीच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांनी सध्या अज्ञात वासात असणाऱ्या शिक्षकांना शोधून त्यांच्याप्रती कृतज्ञता म्हणून जो सत्कार केला त्यामुळे शिक्षक भारावून गेले होते. रयत शिक्षण संस्था संचलित न्यु इंग्लिश स्कुल रुई येथे तब्बल ३१ वर्षानंतर इयत्ता दहावीच्या प्रथम बॅचच्या विद्यार्थ्यांचे व तेव्हा अद्यापन करणाऱ्या गुरुजनांचे स्नेहसंमेलन ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. निफाड तालुक्यातील रुई येथे सन १९८९ साली तत्कालीन समाज सुधारकांनी एकत्र येत गावामध्ये रयत शिक्षण संस्थेचे न्यु इंग्लिश स्कुल चे रोपटे लावले. सन १९९२ मध्ये इयत्ता दहावीची प्रथम बॅच शिक्षण घेऊन बाहेर पडली. आजच्या माहिती व तंत्रज्ञान युगात सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर करत काही विद्यार्थ्यांनी व्हाट्सअप ग्रुप तयार करत सर्व शिक्षक व विद्यार्थी एकत्र जोडले. या सर्व गुरुजन व विद्यार्थी यांचे स्नेहसंमेलन जुन्या आठवणींना उजाळा देत संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत शाळेतील अध्ययन अनुभव, एकत्र केलेला अभ्यास, रात्र अभ्यासिका, शिक्षकांनी केलेल्या शिक्षा, शाबासकी, सांस्कृतिक कार्यक्रम, कवायत इत्यादी खूप साऱ्या आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी शाळा परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. जेष्ठ शिक्षक मंडीलक शिलेदार, गोरक्षनाथ पोफळे, ज्ञानदेव जोरे, किसन दरेकर, चिंधु रोटे, सुनील गाडेकर, चंद्रकांत ठाकरे यांनी देखील मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सर्व गुरुजन तसेच माजी सैनिक शुभेदार अर्जुन शंकपाळ यांचा शाल, गुलाब पुष्प, सन्मान पत्र, पुस्तक भेट देऊन गौरव केला. सर्व माजी विद्यार्थी जुन्या आठवणी मध्ये हरवून गेले होते. इतक्या वर्षांनी सर्व वर्ग मित्र भेटल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर तासकर, लेखक समीर देवडे, अंकुश तासकर, सुरेश तासकर, गोरख तासकर, प्रवीण कासलीवाल, ज्ञानेश्वर चोपडे, अकील शेख, रघुनाथ आहेर, भागवत तासकर, वसंत वाघ, विलास जाधव आदींनी परिश्रम घेतले.



# 'वोट फॉर ओपीएस'चा यशस्वीपणे प्रारंभ

## काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेत गोंडपीपरी टीमने दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपीपरी :** 'एकच मिशन,जुनी पेंशन' या ब्रीदवाक्याने संपूर्ण महाराष्ट्रात वादळ निर्माण केले आहे. 'जुनी पेंशन' ह्या एकमेव मागणीसाठी मोर्चे, आंदोलन,उपोषण, अर्धनग्न आंदोलन,घंटी बजावो, जवाब दो, आक्रोश मोर्चा याद्वारे प्रखर मागणी करण्यात आली पण राजकीय सत्तेने याकडे दुर्लक्ष केले. आज राजकीय पटलावर जुनी पेन्शनचा मुद्दा प्रखरतेने गाजतो आहे. 'जो पेंशन की बात करेंगा, वही देश पे राज करेंगा' अशी स्थिती निर्माण झाली आहे. मृत कर्मचाऱ्यांना कुटुंबनिवृत्ती वेतन, उपदान मिळाले असले तरी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना टेन्शनच का? असा प्रश्न कर्मचाऱ्यांना भेडसावतो आहे त्यामुळे दिल्ली येथे होणाऱ्या पेंशन महारॅलीत सहभागी होण्याचे, विधानसभेत प्रश्न उपस्थित करण्याचे,'VOTE FOR OPS' अभियानाचे निवेदन राजुरा क्षेत्राचे आमदार सुभाष धोटे यांना जनसंवाद यात्रा गोंडपीपरीला पोहचल्यावर देण्यात आले. 'VOTE FOR OPS' म्हणजे कर्मचारी केवळ जी राजकीय सत्ता जुनी पेंशन देईल त्यालाच मतदान करण्याचे आवाहन म रा जुनी पेंशन संघटनेने केले आहे. एक कर्मचारी म्हणजे पन्नास मतदार या हेतूने कौटुंबिक,नातेवाईक, मित्रपरिवार यांना खऱ्या अर्थाने जुनी पेन्शनचे महत्व पटवून देणार आहेत. जुनी पेन्शनच्या मुद्यावर झालेल्या निवडणुकीत सकारात्मक बदल हिमाचल प्रदेश, छत्तीसगड, पंजाब राज्यात दिसून आले आहे म्हणून जुनी पेंशन हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे आणि तो मिळाला पाहिजे यासाठी निवेदन देण्यात आले. निवेदन देतांना नागपूर विभाग कोषाध्यक्ष डॉ.ललीतकुमार शनवारे, संस्थापक जिल्हाध्यक्ष तथा विभागीय उपाध्यक्ष दुशांत निमकर,तालुका अध्यक्ष रत्नाकर चौधरी, सचिव प्रमोद दुर्गे, कोषाध्यक्ष मनोज साबळे, सहसचिव भानुदास केदार,राजेंद्र कोवे, अमोल नैताम, सुनील गिरडकर, स्वप्नील कापडे, विशाल कोमावार, रमेश कोकरे, दिनेश निमकर, निरज चापले इत्यादी अनेक महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



## पुरातत्त्व विभागास डॉ.गोपाल बच्छिरे यांचा इशारा

# लोणारची धारतीर्थ पुन्हा बंद करु देणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** धारतीर्थ ज्याला गंगा भोगावती दक्षिणकाशी अशी उपमा दिलेली आहे. या धारतीर्थावर येणाऱ्या लोकांना आंघोळीसाठी घरी पाणी नाही असे नाही तर ते श्रद्धास्नान करण्यासाठी येतात, धारतीर्थावर श्रद्धास्नान करण्यासाठी महाराष्ट्रातून नव्हे तर भारतातून व प्रदेशातून सुद्धा श्रद्धाळू या धारतीर्थावर श्रद्धा स्नान करण्यासाठी येतात. श्रद्धाळू, पर्यटकांच्या येण्यामुळे लोणार नगरीचा व्यापार उद्योग चांगले स्थितीत चालत आहे जर येथे श्रद्धाळू व पर्यटक येणे बंद झाले तर लोणारची अर्थव्यवस्था डबघाईला येईल म्हणून ही धारातीर्थ व लोणारचे सरोवर नेहमीसाठी खुले असले पाहिजे परंतु पुरातत्त्व विभागाचे अधीक्षक डॉ.अरुण मलिक यांनी डॉ.गोपाल बच्छिरे यांच्याशी संपर्क साधून धारातीर्थावर होत असलेल्या गर्दीमुळे तेथील दगडांची झीज होत आहे व त्या कारणाने आम्ही १७ सप्टेंबर रोजी धारतीर्थ पुन्हा बंद करणार असे सांगितले त्यावर डॉ.गोपाल बच्छिरे यांनी पुरातत्त्व विभागाला उत्तर दिले "जर श्रद्धाळूनंच्या रेलचेल मुळे धारतीर्थाची झीज होत असेल तर अगोदर आग्र्याचे ताजमहल, दिल्लीचा लाल किल्ला, अजिंठयाची लेणी, एलोरा येथील कैलास लेणे, बनारस चे काशीतीर्थ सहित सर्व तीर्थक्षेत्र बंद करा आणि त्यानंतरच लोणारचे पावन विरजधारतीर्थ बंद करण्याविषयी विचार करा अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व लोणार पंचकृषीतील सामान्य नागरिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. भारताच्या स्वातंत्र्यासाठी जे गांधीजींनी केले तसेच धारतीर्थाच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही सुद्धा सविनय कायदेभंग करून धारातीर्थ स्वतंत्र करू "असा धमकी वजा इशारा डॉ. गोपाल बच्छिरे यांनी पुरातत्व विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांना दिला व या आंदोलनात सर्व लोणार परिसरातील बंधू भगिनींनी सहभागी होण्याचे आवाहन सुद्धा केले.



कोरोना काळा पासून बंद असलेली धारतिर्थ या श्रावण महिन्यात सुरू करण्यात आली .पण पूरातत्व विभागाने काही कालावधीसाठी जनतेच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन, सामान्य जनतेला गायमुख मंदिरात आणि कुंडात केवळ श्रावण महिन्यातील सणाच्या निमित्ताने पवित्र स्नान करण्याची परवानगी दिली होती .त्यानंतर काही विशेष प्रसंगी/उत्सवा मध्येच जिल्हाप्रशासना मार्फत विनंती केली असता तिच्या वर विचार केला जाऊ शकतो असे सांगण्यात आले होते .

# नगरपरिषद समोरील ट्राफिक सिग्नल चालू

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** वाढते अपघात व कायद्याचे उलंघन व कायदाची भीती नसल्या मुळे अतिशय निर्दलीय पद्धतीने तरुण मुलं गाडी चालवत व धाक नसून त्यानाचा मध्ये कुठल्या प्रकारची भीती नसल्यामुळे व गाडी स्पीड मोट मोठे हॉर्न लावून व रस्त्याच्या मधो मधी गाय बसून असता व अपघात होतय व लगेच पुराना बस्टॉप येथे वाईन शॉप असल्यामुळे तेथे काही लोक चुकीचा बाजूने जातात व ट्रॅफिक पोलीस तेथे असणे गरजेचे आहे. जेणे करून कुठली अपघात होणार नसून याची खात्री मनसे बल्लारपूर आम्हाला वाटतंय बल्लारपूर मनसे व काही तरुण ट्रिपल सीट बसून गाडी जोरात नेतात व ट्रॅफिक पोलीस यांनी कायद्याचे अंबलबजावणी केल्यास समोर असे अपघात होणार नाही व तरुणांमध्ये कायद्याचे धाक व नियम माहित पडणार अशी मागणी बल्लारपूर महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी केली आहे.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# खासदार समर्थक प्रदीप पाटील फाजगे कार्यकर्त्यांसह शेकापमध्ये

## लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक रणधुमाळीत भाजपा गटाला मोठा धक्का

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** तालुक्यातील दगडसांगवी येथे काल दिनांक १० सप्टेंबर रोजी 30 लक्ष रुपयाच्या सीसी रस्त्याचे भूमिपूजन व शेतकरी कामगार पक्ष प्रवेश सोहळ्यास शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते सी.सी. रस्त्याचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले, यावेळी खासदार समर्थक असलेले दगड सांगवीचे सरपंच प्रदीप पाटील फाजगे यांनी लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे व शेकाप महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शिंदे यांच्या खंबीर विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून दगडसांगवी चे सरपंच प्रदीप पाटील फाजगे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह शेतकरी कामगार पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला, यावेळी आशाताई शिंदे यांनी शेकापमध्ये जाहीर प्रवेश केलेल्या सरपंच प्रदीप पाटील फाजगे यांच्यासह प्रवेश केलेल्या असंख्य कार्यकर्त्यांचा शाल पुष्पहार घालून स्वागत केले. आमदार शिंदे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून लोहा कंधार मतदार संघातील अनेक पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते शेकापमध्ये जाहीर प्रवेश करत असल्याने आमदार शिंदे यांचे मतदारसंघात पारडे भक्कम होत असल्याने आमदार शिंदे यांच्या विरोधकांच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरले आहे. दगड सांगवी येथील शेकाप पक्षप्रवेश सोहळा व सी.सी. रस्ता भूमिपूजन सोहळ्यानंतर शेतकरी कामगार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शिंदे यांनी दगडसांगवी येथील गावकऱ्यांशी बोलताना म्हणाले की, शेतकरी कामगार पक्षात अनेक पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून जाहीर प्रवेश करत असून शेतकरी कामगार पक्षात पक्ष प्रवेश करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्ता व



पदाधिकाऱ्यांना आमदार शिंदे यांच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करत असून शेकापच्या कोणत्याही कार्यकर्त्यावर कधीही अन्याय होणार नाही याची आम्ही दक्षता घेत असल्याचे आशाताई शिंदे यांनी बोलताना सांगितले. दगडसांगवी गावच्या सर्वांगीण मूलभूत विकासासाठी निधीची कदापी कमतरता भासणार नसून दगडसांगवी गावचा मूलभूत विकास करण्यासाठी आमदार शिंदे साहेब भरीव निधी उपलब्ध करून देण्यासाठी कट्टीबद्ध असल्याचे यावेळी आशाताई शिंदे यांनी बोलताना स्पष्ट केले. लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खासदार समर्थक दगडसांगवी चे सरपंच प्रदीप पाटील फाजगे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह शेतकरी कामगार पक्षामध्ये जाहीर प्रवेश केल्यामुळे भाजपा गटाला मोठा धक्का मानला जात आहे. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील, बोरगावचे सरपंच प्रतिनिधी पुंडलिक पाटील बोरगावकर, उपसभापती श्याम अण्णा पवार, दगडसांगवीचे सरपंच प्रदीप पाटील फाजगे, उपसरपंच सुधाकर गोरे,सतीश पाटील कराळे,माधवराव अंगकाडे, ग्रामपंचायत सदस्य कचरू फाजगे, पांडुरंग फाजगे, माधव ढवळे ,धारबा गोरे, तिरुपती बामणवाड, चेअरमन अशोक कल्लाळे, मनोहर फाजगे, सोपान फाजगे, संजय मोरताळे, अंबादास ढवळे, संदीप मोरतळे, शहाजी फाजगे, साईनाथ फाजगे, दिगंबर डिकळे, केशव तिडके, अण्णाराव पवार, सिद्धू पाटील वडजे, सरपंच लक्ष्मण केंद्रे, उपसरपंच अशोक गीते, चेअरमन नागेश हिलाल, फय्याज शेख , सरपंच दुलेखा पठाण, सरपंच संदीप पाटील पौळ , सचिन कदम, सचिन पवार,सरपंच तुकाराम कराळे, सह कार्यकर्ते, पदाधिकारी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आरक्षण मिळेपर्यंत ग्रामस्थांचा येणाऱ्या सर्वच निवडणुकीत मतदानावर बहिष्कार

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** 'मौजे कावसान जुने', 'ता. पैठणचे समस्त ग्रामस्थ मनोज जरंगे पाटील, अंतरवली सराटी, ता. अंबड, जि. जालन्यात मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी उपोषण सुरू करण्याचे स्पष्ट निवेदन असून, जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत सर्व सार्वत्रिक निवडणुकांवर गावोगावी बहिष्कार टाकण्याचा एकमुखी ठराव घेण्यात आला आहे. करीता शासनाला विनंती आहे की, अंत न पाहता मराठा समाजाची मागणी तात्काळ मान्य करून मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, अन्यथा पुढील काळात पुढील आंदोलन तीव्र केले जाईल, असे लेखी निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. कावसानच्या ग्रामस्थांनी सोमवारी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पासुन मोर्चा काढुन तहसीलदार यांना निवेदन दिले. यावेळी दत्ता निवारे, माधव मापारी, कृष्णा निवारे, रवींद्र शिंदे, सुदाम निवारे, सुनील शिंदे, राधाकिसन निवारेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पोळ्याच्या खरेदीसाठी बाजारात शेतकऱ्यांची लगबग, सण आला माझ्या सर्जा राजाचा

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथील बाजार पेठेत सध्या सर्जा राजाचा साज खरेदी साठी शेतकऱ्यांची लगबग दिसून आली. शेतकरी श्रावणात खरेदीसाठी घराबाहेर पडला की, समोर चित्र येते 'पोळा'आल्याचे. कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचा असलेला यंदाचा पोळा सण उद्यावर येवून ठेपल्याने सध्या सर्वत्रच बळीराजाची अगदी मोठी लगबग दिसत आहे. 'सर्जा-राजा'करिता नवा साज खरेदीसाठी बाजारपेठ सजली आहे. म्होरकी, माथवटी, वेसन, कासरा, घुंगरमाळ, छबी-गोंडे, केशरी, तोडे अन् डौलदार बाशिंग आदी साहित्याने बाजारात रंग भरले आहेत.बदलत्या काळानुरूप ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीची मशागत होत असतानाही शेतकरी अन् बैलजोडीचं नातं आजही कायम असल्याचे चित्र 'पोळा' सणाच्या निमित्ताने समोर येते. गुरुवारी साजरा होणाऱ्या पोळा सणासाठी ढवळया-पवळयाला, सर्जा-राजाला खऱ्या अर्थाने सजवून थोडेसे का होईना त्याच्या ऋणातून उतराई होण्यासाठी शेतकरी सज्ज झाले आहेत. यंदा पावसाने दडी मारल्यामुळे तालुक्यातील खरीप हंगाम संकटात सापडला आहे. असे असले तरी, शेतकरी सर्जा-राजाच्या साजशृंगारासाठी पुढे सरसावला आहे. सुलतानपुर येथील बाजार पेठेत खरेदी साठी शेतकऱ्यांची लगबग दिसत आहे. बाजारात बैलांसाठी आलेल्या विविधरंगी साज आला आहे. बाजारातील हे विविध साज अन् त्यांचे यंदाचे भाव बघता गतवर्षीच्या तुलनेत यंदा प्रत्येक साजाच्या किंमतीत वाढ झाली आहे.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर